DOCUMENT RESUME

ED 230 047 FL 013 714

AUTHOR Nimbkar, Jai; Berntsen, Maxine
TITLE Marathi Readings.
INSTITUTION American Inst. of Indian Studies, New Delhi.
SPONS AGENCY Department of Education, Washington, D.C. Div. of International Education.
PUB DATE 83
GRANT G008002136
NOTE 82p.; For related documents, see FL 013 711-715.
PUB TYPE Guides - Classroom Use - Materials (For Learner) (051) -- Multilingual/Bilingual Materials (171)
LANGUAGE Marathi; English

EDRS PRICE MF01/PC04 Plus Postage.
DESCRIPTORS Adults; Bilingual Instructional Materials; Conversational Language Courses; *Cultural Background; Dialogs (Language); English; *Marathi; *Reading Materials; *Second Language Learning
IDENTIFIERS *India (Maharashtra)

ABSTRACT

This reader is designed for adult learners of Marathi at the intermediate level. Many of the passages are in the form of conversations. They concern topics pertinent to Maharashtra culture and the everyday life of the people, such as recreational outings, professional life, marriage and the family, education, entertainment, weather and seasons, and topics of current interest. The selections are presented in two columns, one in Marathi and the other in English. (AMH)

****
* Reproductions supplied by EDRS are the best that can be made *
* from the original document. *
****

ED230047

MARATHI READINGS

U.S. DEPARTMENT OF EDUCATION
NATIONAL INSTITUTE OF EDUCATION
EDUCATIONAL RESOURCES INFORMATION CENTER (ERIC)

X This document has been reproduced as received from the person or organization originating it.
Minor changes have been made to improve reproduction quality.

• Points of view or opinions stated in this document do not necessarily represent official NIE position or policy.

"PERMISSION TO REPRODUCE THIS MATERIAL HAS BEEN GRANTED BY

AIIS

TO THE EDUCATIONAL RESOURCES INFORMATION CENTER (ERIC)."

JAI NIMBKAR
MAXINE BERNTSEN

FL 013 714

AIIS

American Institute of Indian Studies, New Delhi

माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेही पैंजासीं जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥

The above lines from the cover are from the *Dnyāneshwari*, the famous thirteenth-century Marathi commentary on the Bhagawad Gita py the poet Dnyaneshwar.

One of Dnyaneshwar's great achievements was to put the teaching of the Gita into the language of the people at a time when most religious discourse was conducted in Sanskrit. The poet himself was fully aware of the significance of his work, as we see in the lines reproduced here from the *Dnyāneshwari* 6:14.

I fondly use Marathi, it is true,
But I'll find words so sweet I wager
They'll surpass even heaven's nectar.

माझा मराठाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेही
पैजासीं जिंके। ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन॥
माझा मराठाचि बोलु कौतुकें। परि अमृतातेही
पैजासीं जिंके। ऐसीं अक्षरें रसिकें। मेळवीन॥

MARATHI READINGS
1983

Printed in India by C. S. Latkar, Kalpana Mudranalaya, 461-4, 'Shiv-Parvati,' Tilak Road, Pune 411030, and published by P. R. Mehendiratta, Director, American Institute of Indian Studies, D-176 Defence Colony, New Delhi 110024.

The research reported herein was performed pursuant to a grant from the U.S. Department of Education as part of the International Research and Studies Program, under the authority of Title VI, section 605 of the Higher Education Act of 1965.

All rights reserved by the authors, Jai Nimbkar and Maxine Berntsen.

Jacket
Aay's Advertising

PREFACE

This volume is a bilingual Marathi reader. It is designed for adult learners of Marathi at the intermediate level and intended to be used after our *Marathi Conversational Situations* and before our *Intermediate Marathi Reader*.

Often at the intermediate level students concentrate on reading and lose the conversational skills they developed at the elementary level. We hope that this book, with most of the readings in the form of conversations, will help integrate conversation and reading skills and enable the student to continue progress in both.

The readings in this volume should not only help the student to improve his language skills but should give him a sense of what is going on in contemporary Maharashtrian life and thought. All the passages in this book have been written by Jai Nimbkar.

Though this volume was designed for learners of Marathi it should also be of use for Maharashtrian learners of English. If it indeed proves successful for this purpose it will be a matter of great satisfaction.

Maxine Berntsen

CONTENTS

Outings

एक भीमाशंकरची ट्रिप
A Trip to Bhimashankar 3

दोन एस. टी. चा प्रवास
Traveling on the S. T. 6

तीन सिंहगडची सहल
An Outing to Sinhagad 9

Professional Life

चार गोल्डस्टोन देशमुखांची गाठ घेतात
Goldstone Meets Deshmukh 15

पाच भाषण देण्यासाठी निमंत्रण
An Invitation to Give a Speech 16

Marriage and Family

सहा लग्नाचं आमंत्रण
A Wedding Invitation 21

सात रजिस्टर्ड लग्न
A Civil Marriage 23

आठ प्रेमविवाह
A Love Marriage 25

नऊ घटस्फोट—अमेरिकेत व भारतात
Divorce—in the U. S. and India 27

Education

दहा — कॉलेज—अभ्यासासाठी की गमतीसाठी ?
College—for Study or Fun? 31

अकरा — सर्वज्ञ शिक्षक
The Omniscient Teacher 33

बारा — पोट भरण्याचा राजमार्ग
The Royal Road to Earning a Living 36

तेरा — ग्रामीण विभागात इंग्रजी मीडियम
English Medium in the Rural Areas 38

Entertainment

चौदा — सिनेमातील हिंसाचार
Violence in the Cinema 43

पंधरा — मैफल
A Vocal Recital 46

Weather and Seasons

सोळा — हिवाळ्याची थंडी
Winter's Cold 51

सतरा — हिवाळा
Winter 53

अठरा — उन्हाळा
Summer 55

Current Topics

एकोणीस — जळणासाठी झाडे
Trees for Firewood 61

वीस	जंगलतोड—जबाबदारी कोणाची ?	
	Deforestation—Who Is to Blame ?	63
एकवीस	तांत्रिक शिक्षणाची गरज	
	The Need for Technical Training	65
बावीस	सामाजिक प्रतिष्ठा—फक्त पांढरपेशांनाच	
	Social Prestige—Only for the White-collared	67
तेवीस	भिकारी	
	Beggars	70
चोवीस	शेतकरी आंदोलन	
	The Farmers' Movement	73
पंचवीस	राखीव जागा	
	Reserved Seats	77

MARATHI READINGS

OUTINGS

भीमाशंकरची ट्रिप

A Trip to Bhimashankar

सुधा : कशी काय झाली ट्रिप तुमची ?

How was your trip ?

आई : फारच छान झाली. भीमाशंकरचं जंगल इतकं सुंदर आहे. एवढं दाट जंगल मी महाराष्ट्रात पाहिलं नाही कुठे.

It was great. The Bhimashankar forest is so beautiful. I haven't seen such a dense forest anywhere else in Maharashtra.

सुधा : टिकलं कसं ते ?

How has it lasted ?

आई · कुणाला ठाऊक बाई. तिथल्या लोकांना विचारलं की इथल्या जंगलाची तोड कशी होत नाही, तर ते म्हणाले फॉरेस्ट खात्याचे लोक तोडूच देत नाहीत. मग इतर ठिकाणी कसं तोडू देतात देव जाणे.

I don't know. When we asked the people there how come the forest isn't being cut down they said the forest department people don't allow it. Then how they allow it in other places God knows.

सुधा : भीमा नदीचा उगम पाहिलात की नाही ?

Did you see the source of the Bhima River ?

आई : हो तर. एक कुंड आहे नेहमी-प्रमाणे. बरीच देवळं आहेत पण तिथे काही विशेष बघण्यासारखं नाही.

Of course. There's a pool there as always. And there are a lot of temples, but there's nothing particularly worth seeing.

सुधा : मग केलंत काय चार दिवस ?

Then what did you do for four days ?

आई : इकडे तिकडे भटकलो. एवढंच आहे, जंगल खूप दाट असल्यामुळे चांगली पायवाट असल्याशिवाय जाणं धोक्याचं आहे. नाहीतर आत जाऊन वाट चुकली की दिशा सुद्धा कळणं कठीण आहे.

We wandered here and there. The only thing is, because the forest is so dense it's dangerous to go anywhere except on a well-trodden path. Otherwise, if you go in and lose your way, it's hard even to find your direction.

सुधा : गाव मोठं आहे का बरंच ?

Is the town quite big ?

आई : छे, कुठलं ? साताठ घरं आदिवासींची, एक मुसलमानाचं आणि पाच ब्राह्मणांची. एवढंच गाव. फक्त तीर्थाचं स्थान म्हणून बरेच लोक येतात तेव्हा एक हॉटेल आहे, एक लहानसं दुकान आहे आणि धर्मशाळा आहे. आम्ही राहिलो होतो ते फॉरेस्ट रेस्ट हाऊस गावापासून दहा मिनिटांच्या रस्त्यावर एका टेकडीवर आहे. टेकडीवरून भोवतालचा देखावा सुरेख दिसतो. भीमाशंकरचं पठार म्हणजे घाटमाथ्याचाच भाग आहे. तो उतरलं की खाली कोकणात. त्यामुळे ठिकठिकाणी हजार दीड हजार फूट उंचीचे कडे आहेत. कड्यावर उभं राहिलं की खाली उतारावर सुद्धा जंगल दिसतं. वरनं खाली जंगलाकडे पाहायला खूप मजा येते. नुसती झाडंच झाडं. खालची जमीन काही दिसत नाही. आणि हिरव्या रंगांच्या इतक्या छटा– अगदी पांढरट हिरव्यापासून तो गडद काळपट हिरव्यापर्यंत – की खूप वेळ पाहिलं तरी कंटाळा येत नाही. त्या मानाने उत्तरेकडची सूचिपर्णी[2] झाडांची जंगलं एकरंगी आणि कंटाळवाणी वाटतात.

Not at all. Seven or eight tribal people's houses, one Muslim's, and five Brahmans'. That's all the town there is. Only because it's a holy place and many people go there, there is a restaurant, a small store and a *dharmashala*[1]. The forest rest house where we stayed is a ten-minute walk away from town, on a small hill. From the hill there's a lovely view of the surrounding countryside ('the view of the surroundings looks lovely'). The plateau of Bhimashankar is part of the plateau which is the top of the Western Ghats. When you descend from there you're down in the Konkan. So in some places there are cliffs a thousand, fifteen hundred feet high. When you stand on the edge of the cliff you can also see forest on the slopes below. It's fascinating ('much fun comes') to look down from above at the forest below. Just trees and trees. The ground below is not visible. And there are so many shades of green, from whitish green to deep, blackish green—that even when you look for a long time you don't get tired of it. In comparison, the evergreen forests of the North seem monochromatic and boring.

सुधा : मग एवढ्या दाट जंगलात काही जंगली जनावरं वगैरे असतील.

There must be a lot of wild animals in such a dense forest.

आई : बिबळे वाघ, चित्ते, मेकरं, हरणं वगैरे असतात म्हणून लोक सांगत होते. आमच्या फॉरेस्ट रेस्ट हाऊसच्या चौकीदाराचं कुत्रं आदल्या आठवड्यात

People were saying there were leopards, panthers, *bhekar*[3], deer, and such. The week before a panther had carried off the forest rest house watchman's dog, they

वाघानं नेलं म्हणे. आम्ही हिंडताना एका ठिकाणी वाघाची विष्ठा पाहिली पण वाघाचं ओरडणं काही ऐकलं नाही. मग एक दिवस एक भेकर पाहिलं चरताना. तेव्हा मला फारच आनंद झाला. पण नंतर कळलं की ते एका माणसानं पाळलेलं आहे म्हणून. ह्याशिवाय आम्हाला दिसलेला प्राणी म्हणजे वानर. खूप वानरं होती जंगलात. अधनं मधनं त्यांचं हूप हूप असं ओरडणं ऐकायला यायचं आणि झाडांवरनं उड्या मारताना दिसायची.

say. While wandering around we saw a leopard's droppings in one place but we didn't hear a leopard call. Then one day we saw a *bhekar* grazing. I was delighted but later I found out that some man kept it as a pet. Besides that we also saw monkeys ('the animal that we saw was the monkey'). There were a lot of monkeys in the forest. From time to time we could hear their crying " whoop, whoop, " and we could see them jumping from the trees.

सुधा : राहायची सोय बरी होती का ?

Were the living arrangements all right?

आई : हो, चांगली होती. मात्र आम्ही राहात होतो तिथे वीज नव्हती, पाणी बादलीनं भरून आणायचं. आणि दूध मिळत नव्हतं म्हणून चहा कॉफीला सुट्टी. पण आम्हाला मुख्य आवडलं म्हणजे आमची दिवाळी एकही फटाका न ऐकता गेली. रात्री वगैरे इतकं शांत असायचं. एवढी शांतता गावात राहून कधीच अनुभवायला मिळत नाही.

Yes. they were fine. However, there was no electricity and we had to bring ('fill and bring') water in a bucket. And because there was no milk we had to go without tea and coffee ('there was a holiday from tea and coffee'). But the thing we liked best was that we spent Diwali ('our Diwali went') without hearing a single firecracker. At night especially it was so quiet. Living in a town you never get to experience such quiet.

Notes

[1] travelers' hostel

[2] सूचिपर्णी literally means ' needle leafed. '

[3] a small species of deer

दोन

एस. टी. चा प्रवास

Traveling on the S. T.

१ : काल उशीर झाला तुम्हाला यायला ?

You arrived late yesterday ?

२ : हो. गाडी लेट झाली. वाटेत ब्रेकडाऊन झाली होती. एस्‌टीच ती. वेळेवर पोचली तरच आश्चर्य मानायचं. असली वेकार सर्व्हिस चालवण्यापेक्षा प्रायव्हेट कंपन्यांना का परवानगी देत नाहीत कोण जाणे.

Yes, the bus was late. There was a breakdown on the way. It's the S.T., after all. You should feel surprised if it does arrive on time. I don't know why they don't give permission to private companies instead of running such a useless (bus) service (themselves).

१ : प्रायव्हेट बस सर्व्हिस एस्‌टीपेक्षा जास्त कार्यक्षम असते अशी तुमची समजूत आहे का ?

Are you under the impression (' is it your idea ') that a private bus service is more efficient than the S.T. ?

२ : अर्थातच असते. नुकताच मी एका खाजगी कंपनीच्या आरामगाडीने बेळगाव ते पुणे प्रवास केला. तिचं टाइमटेबल अचूक होतं एवढंच नव्हे तर प्रवासही एस्‌टीपेक्षा कितीतरी जास्त आरामात झाला.

Of course it is. Just recently I traveled from Belgaum to Pune on a private luxury bus. Not only was it right on time but the trip was a lot more comfortable (' happened in so much more comfort ') than the S.T.

१ : हे फक्त तुम्ही एका गाडीचं उदाहरण घेतलं. मी गेली कित्येक वर्षं महिन्यातून दोन–तीनदा एस्‌टीनं प्रवास करतो––सबंध महाराष्ट्रभर. आणि माझ्या मते बहुसंख्य वेळा एस्‌टीच्या गाड्या वेळेवर धावतात. शिवाय एस्‌टीनं किती रूट चालू केले आहेत. प्रायव्हेट कंपन्या फक्त जिथे

You've given (' taken ') the example of only one bus. For many years I have been traveling two or three times a month on the S.T.—all over Maharashtra. And in my opinion, most of the time S.T. buses run on time. Besides, the S.T. has started so many routes. Private companies go only on those routes where they can make a big profit (' where there is much

२५ खूप फायदा होतो अशाच रूटवर जातात. आणि एकूण कार्यक्षमतेच्या बाबतीतही माझा अनुभव तुमच्यापेक्षा वेगळा आहे. पूर्वी बहुतेक दक्षिण भारतात प्रायव्हेट बसेस असायच्या. त्यांची ३० स्थिती पाहिली असतीत तर डबड्यात डबडी एस्‌टी सुद्धा त्यापेक्षा उत्तम परिस्थितीत आहे असं म्हटलं असतंत. पुन्हा ह्या गाड्या कधी वेळेवर सुटायच्या नाहीत. एखाद्या गावातला ३५ कुणी प्रतिष्ठित असामी किंवा सरकारी अधिकारी प्रवास करणार असला की तो येईपर्यंत गाडी थांबवून धरत असत. मग इतरांना किती का उशीर होईना.

profit'). And on the whole, as for efficiency too, my experience is different from yours. Formerly in most of South India there were private buses. If you saw the condition that they were in, you would have said that even the most rickety S.T. is in far better condition than that. Besides, these buses never used to leave on time. If some important person in the town or some government official was going to travel they would hold the bus until he came. No matter how late others got.

४० २ : बापरे, मग त्यापेक्षा आपली एस्‌टीच बरी म्हणायची.

Gosh, I must say that even our S. T. is all right compared to that.

१ : बरी म्हणजे काय—चांगलीच. आणखी पुरावा हवा असला तर इतर राज्यांतून प्रवास करून पहा. मध्य ४५ प्रदेश काय, उत्तर प्रदेश काय, काश्मीर काय. तिकडे बसने प्रवास करायचा म्हणजे दिव्यच असतं. तिथल्या लोकांना वेळापत्रक ह्या गोष्टीबद्दल काहीही आदर नसतो. आणि ५० बसमध्ये किती प्रवासी घ्यायचे ह्याला काही मर्यादा नसते. जेवढ्या सीट्‌स् असतील त्याच्या दोनअडीच पट सुद्धा प्रवासी घेतात. त्यापेक्षा आपली महाराष्ट्रातली एस्‌टी हजार पटीने बरी. ५५ अर्थात त्यातही सुधारणेला जागा आहे

Not just all right, but good. If you want more proof, travel in other states. Whether it's Madhya Pradesh, Uttar Pradesh, or Kashmir—there traveling by bus is an ordeal. People there have no regard at all for the thing called the timetable. And there's no limit to the number of passengers they take in the bus. They take even two or two and a half times as many passengers as there are. Our Maharashtra S. T. is a thousand times better than that. Of course, there's room for improvement in it, but the S.T.

पण त्याची एस्‌टीच्या अधिकाऱ्यांना जाणीव आहे आणि ते त्या दिशेने पावलं उचलताहेत.

authorities are aware of this and are taking steps in that direction.

२ : आता पुन्हा एस्‌टीचा प्रवास करताना
६० शिव्या देण्याऐवजी कौतुकच करायला पाहिजे.

Now next time I ride ('while again riding') the S.T. instead of cursing it I'll have to be more appreciative.

सिंहगडची सहल

An Outing to Sinhagad

संजय : ए राजू, आम्ही ह्या रविवारी सिंहगडला जायचं ठरवलंय. दिप्या, भालू न् मी. तू पण चलणार ना ?

Hey, Raju, we've decided to go to Sinhagad this Sunday—Dipya, Bhalu and me. You're going to come too, aren't you ?

राजू : नाहीरे, मला नाही जमायचं.

No, I won't be able to make it.

संजय : जमायचं काय त्यात ? लेका, तुझं सदाच रडगाणं असतं. मागल्या वेळेला मजा आली की नाही ?

What do you mean you can't make it ? Dammit, you're always finding excuses not to do things ('you're always whining'). Didn't we have fun last time?

राजू : मजा येत नाही असं कुठं म्हटलं मी ?

I didn't say we didn't.

संजय : मग का भाव खातोयस ?

Then why are you playing hard to get?[1]

राजू : संज्या, तुला माहीताय मी भाव खात नाही.

Sanjya, you know very well I'm not playing hard to get.

संजय : मग का ताणतोयस उगाच ?

Then why are you holding out ?

राजू : आई परवानगी द्यायची नाही. मागल्या वेळी सुद्धा खूप हट्ट केला तेव्हा येऊ दिलंन[2] मला. आणि आता तर सिंहगडावर जायचं म्हणजे तर ती ऐकूनच घ्यायची नाही.

My mother won't give permission. Last time too she let me go only because I kept after her till she gave in. And especially now if I say I want to go to Sinhagad she won't even listen

संजय . अरे पण का ? मागे तर नेहमी यायचास. आपली नेहमी चौकडी असते आणि आता तू दरवेळी असं करायला लागलास की मग काय गंमत

But why ? You always used to come. We're always a foursome, and now if you start to act like this every time, what fun is left ?

उरली ? तुझी आई एकदम का अशी बदलली ?

What made your mother suddenly change ?

राजू : तो एक मुलगा रायगडावर अपघात होऊन मेला ना, तेव्हापासून ती मला कुठेही पाठवायला खळखळ करायला लागली.

Ever since that kid died in an accident on Raygad, she's started to balk at sending me anywhere.

संजय : त्याचा आपला काय संबंध ? आपण काही कडे चढायला जात नाही. नुसतं सहल म्हणून जातो.

What does that have to do with us ? We're not going cliff-climbing, we're just going on a picnic.

राजू : ते तिला सांगून काही पटत नाही. ती म्हणते, तुम्ही पोरं बेजबाबदारपणे काहीतरी करता न् आमचा जीव जातो.

Telling her that doesn't convince her. She says you boys do something reckless and we're the ones who suffer.

संजय : च्यायला, आता ह्या कर्माला काय करायचं ? तू विचारून तरी बघ.

Dammit, what can we do? Ask her and see anyway.

राजू : विचारण्यात काही अर्थ नाही. तिचं उत्तर मला आधीच माहिती आहे. आणि तिच्याशी भांडून येणं माझ्याने होणार नाही.

There's no point in asking her. I already know what she'll say. And I can't bring myself to fight with her and come.

संजय : ए हे बघ, असं केलं तर ? तू तिला सांगूच नको सिंहगडाला जायचंय म्हणून. नुसतं माझ्याकडे येतोयस म्हणून सांग, मग तिथून जाऊ आपण. डबा बिबा घेऊन येऊ नको म्हणजे तिला संशय येणार नाही.

Look, how about if we do this? Don't tell her you're going to Sinhagad. Just say you're coming to my house. Then we can go from there. Don't bring any lunch or anything, so she won't suspect.

राजू : अशी फसवाफसवी मला जमायची नाही संजय. तू आपला माझा नाद सोडून दे.

I can't lie like that, Sanjay. Why don't you just leave me out?

Notes

[1]भाव खाणं means 'to give oneself undue importance.'

[2]दिलंन is a variant of दिलं.

PROFESSIONAL LIFE

गोल्डस्टोन देशमुखांची गाठ घेतात

Goldstone Meets Deshmukh

गोल्डस्टोन : नमस्कार. आपण बाळासाहेब देशमुख का ?

Namaskar. Are you Balasaheb Deshmukh ?

देशमुख : हो. याना आत. बसा.

Yes, do come in. Sit down.

गोल्डस्टोन : मी डेव्हिड गोल्डस्टोन. जेजुरीच्या खंडोबाविषयी खास अभ्यास करतो आहे. ह्या विषयाबद्दल आपल्याकडून माहिती मिळेल असं मला कळलं.

I'm David Goldstone. I'm doing a special study of the Jejuri Khandoba. I understand that I might be able to get some information about this from you.

देशमुख : कशा स्वरूपाची माहिती हवी आहे तुम्हाला ?

What sort of information do you want ?

गोल्डस्टोन : मुख्य म्हणजे त्या दैवताचा इतिहास.

Particularly the history of the god.

देशमुख : तुम्ही ह्याबद्दल मी लिहिलेलं एक पुस्तक आणि एक दीर्घ लेख वाचला आहे का ?

Have you read my book and monograph on the subject ?

गोल्डस्टोन : हो. दोन्ही वाचलंय. पण मला तरीही काही प्रश्न विचारायचे आहेत. आत्ता तुम्हाला वेळ आहे का?

Yes, I've read both. But I still have some questions I would like to ask. Do you have time just now ?

देशमुख : हो, विचारा ना. पण आधी एक मी विचारतो. चहा घ्याल ना ? (बायकोला) ए, जरा दोन कप चहा करून आण.इकडे.

Go ahead. But first let me ask you one—will you have some tea ? (*to wife*) Say, make two cups of tea and bring it here.

पाच

भाषण देण्यासाठी निमंत्रण

An Invitation to Give a Speech

Sarla Gore, a representative of a women's club, comes to invite Yashodhara Kamble, a dalit woman writer, to give a talk.

कांबळेबाई : या. कोण पाहिजे तुम्हाला ?	Come in. Who do you want ?
गोरेबाई : यशोधरा कांबळे तुम्हीच ना ?	You're Yashodhara Kamble, aren't you ?
कांबळेबाई : हो.	Yes.
गोरेबाई : मग तुमच्याकडेच काम होतं. माझं नाव सरला गोरे. मी आमच्या महिला मंडळातर्फे तुम्हाला एक विनंती करायला आले आहे.	Then It's *you* I've come to see. My name is Sarla Gore. I've come to make a request to you on behalf of our women's club.
कांबळेबाई : काय ती ?	What request ?
गोरेबाई : आम्ही दर वर्षी शारदोत्सव साजरा करतो. त्या निमित्ताने काहीतरी नवी माहिती आमच्या सभासदांना मिळावी, एखादा चाकोरीबाहेरचा अनुभव मिळावा अशी आमची धडपड असते. यंदा आम्ही समाजाच्या निरनिराळ्या थरांतल्या लेखिकांची भाषणं ठेवली आहेत. तर आमच्या मालिकेत तुम्ही एक भाषण द्यावं अशी आमची फार इच्छा आहे.	Every year we celebrate the Sharada festival. For that we always make an effort to see that our members find out about something new or experience something out-of-the way. This year we've arranged speeches by women writers of various social levels. So we are very anxious that you should give one of the talks in our series.

कांबळेबाई : माफ करा, पण मी आत्ता-पर्यंत कुठेच अशी भाषणं वगैरे केलेली नाहीत.

I'm sorry, but I've never given talks of this sort anywhere until now.

गोरेबाई : तसं भाषण म्हणजे अगदी व्यासपीठावरून केल्यासारखं मुद्देसूद भाषण हवं असं नाही. तुम्ही काहीही सांगू शकता—तुमच्या लेखनामागच्या प्रेरणा, एक दलित लेखिका म्हणून तुमचे अनुभव. तुम्हाला हवं त्या विषयावर बोला.

'Talk' doesn't mean we want a formal, organized speech. You can tell us anything—the inspiration behind your writing — your experiences as a *dalit* writer. Talk about whatever you like.

कांबळेबाई : माझे अनुभव तुमच्या महिला मंडळातल्या बायकांना रुचतील की नाही कुणास ठाऊक. जाऊदे, उगीच तुम्ही मला आग्रह करू नका.

I'm not so sure your women's club members would appreciate my experiences. Let it be, please don't insist.

गोरेबाई : असं म्हणू नका हो. तुम्ही काय जे बोलाल ते आम्हाला इंटरेस्टिंग वाटेल. त्याची तुम्ही काळजी करू नका. मुद्दाम सर्वसामान्य स्त्रियांच्या चाकोरीबाहेरचं काही तरी त्यांना दाखवायचं अशा विचारानंच तर तुम्हाला बोलवायचं ठरवलं आम्ही. तेव्हा तुम्हाला यायलाच पाहिजे.

Don't say that. We'll find whatever you say interesting. Don't worry about that. We deliberately decided to invite you with the idea of showing ordinary women something outside of their routine lives. So you must come.

कांबळेबाई : कधी ठेवलंय माझं भाषण ?

When have you arranged my speech for ?

गोरेबाई : सोमवारी संध्याकाळी सहा वाजता. पण तुम्हाला ही वेळ किंवा दिवस सोईचा नसला तर बदलून देता येईल.

Monday evening at six. But if this time or day isn't convenient for you it can be changed.

कांबळेबाई : सोमवार संध्याकाळ ठीक आहे.

Monday evening is all right.

गोरेबाई : मग साडेपाचच्या सुमाराला मी न्यायला येऊ ?

Then shall I come to pick you up about five-thirty ?

कांबळेबाई : या. मी तयार राहीन. पण माझ्याकडून फार काही अपेक्षा ठेवू नका.

All right. I'll be ready. But don't expect very much from me.

गोरेबाई : तुम्ही काळजी करू नका हो. तुम्ही जे सांगाल ते सगळ्यांना खूप आवडेल. बरं, मग येऊ मी ? सोमवारी भेटू. आणि थँक्स हं, आमंत्रण स्वीकारल्याबद्दल.

Don't you worry. Everybody will like very much whatever you have to say. Well, shall I be going now? We'll meet on Monday. And thank you for accepting our invitation.

MARRIAGE AND FAMILY

लग्नाचं आमंत्रण

A Wedding Invitation

A couple come to invite another couple to their son's wedding. The couple coming to give the invitation have been designated नवरा-बायको १.

नवरा २: या, या. तुमच्याकडे बघितल्याबर तुम्ही कशासाठी आलायत ते न विचारता कळतंच आहे. कसलं कार्य काढलंय ?	As soon as we saw you we could tell why you've come even without asking. What is the occasion?
नवरा १: आमच्या विश्वजितचं लग्न.	Our Vishwajit's wedding.
बायको २: वा, अभिनंदन. कुठली मुलगी आहे ?	Congratulations. Where is the girl from ?
बायको १: मुंबईची आहे. एम्.बी.बी.एस्. झालेली आहे.	She's from Bombay. She's an M.B.B.S.
नवरा २: बाकी जोड्याने येऊन अक्षत देण्याची पद्धत जवळ जवळ गेल्यासारखीच आहे हल्ली.	These days the custom of a couple coming to give a formal invitation has almost disappeared.
बायको १: अहो, ही माझी हौस हो सगळी. मी ठरवलंय, आमच्या घरातलं शेवटचं कार्य आहे, सगळं साग्रसंगीत झालं पाहिजे.	This is all my idea. I have decided that since this is the last wedding in our family everything must be done in style.
बायको २: कुठे करताय लग्न ?	Where are you having the wedding ?
नवरा १: पुण्यातच. त्यांचेही बरेच नातेवाईक वगैरे पुण्यातच असतात, म्हणून इथेच करायचं ठरवलं.	Right here in Pune. A lot of their relatives also live in Pune so we decided to have it here. It's

आम्हालाही सोयीचं. तेव्हा तुम्हाला यायलाच पाहिजे.

convenient for us too. So you must come.

नवरा २: अर्थात येणारच आम्ही. विश्वजितचं लग्न आणि आम्ही येणार नाही असं शक्य आहे का?

Of course we're coming. Vishwajit's wedding and we not attend it? Is that possible ?

बायको १: एकोणीस तारखेचा मुहूर्त धरलाय. लग्न आहे सकाळी दहा वाजता. वैदिक पद्धतीनं करणार आहोत. मुलीकडच्यांना हवं होतं रजिस्टर लग्न. हल्ली त्याचीच जरा फॅशन आहे ना? पण मी म्हटलं आपल्याला काही ते पटत नाही. चांगलं मंत्रबित्र म्हणून विधिपूर्वक लग्न लागलं पाहिजे. सह्या करून कसलं लग्न? शेवटी त्यांनी कबूल केलं. तर तुम्ही अक्षता टाकायला या. जेवायलाही राहायचं हं.

We've chosen the *muhurt* on the nineteenth. The wedding is at ten in the morning. We are going to do it in traditional Vedic style. The girl's people wanted a registered wedding. That's rather the fashion these days, isn't it? But I said that I didn't believe in that. You have to have a wedding with all the mantras and rituals and ceremonies. Just signing a register—what kind of wedding is that? Finally they agreed. So come for the wedding ceremony ('come to throw rice'). And you must stay on for dinner.

नवरा १: आणि संध्याकाळी रिसेप्शन आहे. मग नक्की या. श्रुतिमंगल कार्यालयात १९ तारखेला. विसरू नका. (पत्रिका देतो).

And the reception is in the evening. So be sure to come. On the nineteenth in the Shruti Mangal Karyalay.[1] Don't forget. (*He gives the invitation card.*)

नवरा २: (पत्रिका घेत) विसरू कसे?

(*Taking the card*) How can we forget?

नवरा १: बरं येतो.

Well, we'll be going.

नवरा२ : या, नमस्कार.

See you. Namaskar.

Notes

[1] a marriage hall

रजिस्टर्ड लग्न

A Civil Marriage

१: तुमच्या मुलीचं लग्न झालं म्हणे ?

Your daughter's gotten married, I hear.

२: हो, गेल्या आठवड्यातच झालं. आम्ही काही मोठा समारंभ वगैरे केला नव्हता.

Yes, she got married just last week. We didn't have a big ceremony or anything.

१: का बरं ? तुमच्यासारख्यांनी तर खूप धूमधडाक्यानं लग्न लावायला पाहिजे.

Why not? People like you should celebrate a wedding with a big bang.

२: आम्हाला कुणालाच ते आवडत नाही.

None of us likes that sort of thing.

१: मुलीची सुद्धा हौस नव्हती का ?

Your daughter didn't want it either ('didn't have any enthusiasm for it either')?

२: छे, मुळीच नाही.

Not in the least.

१: लग्न कुठल्या पद्धतीनं ? वैदिक का ?

What type of wedding was it? Vedic?

२: नाही, रजिस्टर.

No, registered.

१: म्हणजे नुसतं सह्या ठोकून.

You mean, just putting down signatures.

२: हो.

Yes.

१: तसं विचित्र वाटत नाही का हो ?

Doesn't that seem rather strange?

२: त्यात काय विचित्र वाटायचंय? भटजीने समोर बसून मंत्र पुटपुटणं हेही मला तितकंच विचित्र वाटतं. आणि कुठल्याही धार्मिक लग्नविधीतले शब्दही हास्यास्पदच असतात. शेवटी लग्न हा एक करार असतो. मग तो रजिस्ट्रारसमोर सह्या करून केला तर कुठं बिघडलं?

What's so strange about that? I feel it's just as strange for a priest to sit in front of you and mumble mantras. And in any religious ceremony the words too are laughable. After all, a marriage is a contract. Then what's wrong in making it by signing in front of a registrar?

प्रेमविवाह

A Love Marriage

१ : परांजप्यांच्या मुलानं आपलं आपण लग्न ठरवलं.

Paranjpe's son arranged his own marriage.

२ : हो, ऐकलं मी. चांगली गोष्ट आहे. आईबापांनी बघूनबिघून लग्न ठरवायचं हे किती दिवस चालायचं? आता ही शिकलेली मुलं लग्न करीतो पंचवीस-सव्वीस वर्षांची होतात, तेव्हा आपल्याला कसल्या तऱ्हेचा नवरा किंवा बायको पाहिजे ते त्यांचं त्यांना कळायला हवं.

Yes, I heard. That's good ('a good thing'). How long are we going to go on having parents arrange marriages?[1] Nowadays these educated kids are twenty-five, twenty-six by the time they get married, so they ought to know what kind of husband or wife they want.

१ : पंचवीस-सव्वीस वर्षांची झाली तरी अनुभवानं कमीच असतात. शिवाय तरूण मुलं गौण गोष्टींना महत्त्व देण्याची शक्यता जास्त असते.

Even if they're twenty-five or twenty-six they lack experience. Besides, there's more likelihood of young people giving importance to secondary things.

२ : आईबाप बघताना तरी काय, मुलीच्या रूपाला अवास्तव महत्त्व देतातच की. रूप किंवा रंग ह्यांपेक्षा तिच्या व्यक्तिमत्वाला जास्त महत्त्व नको का? बघून पसंत केलेल्या मुलाचं किंवा मुलीचं व्यक्तिमत्व, स्वभाव कसा आहे ते कळायला काहीच मार्ग नसतो. त्यापेक्षा ओळख होऊन केलेल्या लग्नात आपले स्वभाव जमतात की नाही ह्याची आधी कल्पना येते.

Why, even when parents look (for a bride) they give undue importance to her looks. Shouldn't her personality be given more importance than her looks or skin color? There is no way of finding out about the personality or character of a boy or girl you just see briefly and approve of. On the other hand, in a marriage where the couple get to know each other in advance they get some idea of whether their personalities are compatible or not.

१ : पण स्वभावापेक्षा शारीरिक आकर्षणालाच जास्त महत्त्व दिलं जाण्याची शक्यताही नाकारता येत नाही. ह्याउलट आईवडील मुलाच्या किंवा मुलीच्या कुटुंबाची, एकूण कौटुंबिक वातावरणाची, सांपत्तिक स्थितीची चौकशी करतात. तेव्हा बघून ठरवून केलेलं लग्न यशस्वी होण्याची जास्त शक्यता असते.

But you can't deny the fact that they are more likely to give more importance to physical attraction than to personality ('but one cannot deny the possibility of more importance being given to physical attraction than to personality'). On the other hand, the parents inquire about the boy's or girl's family, the family background, and their financial status. So there's more likelihood of an arranged marriage being successful.

२ : असं मुळीच नाही. बाकी सगळ्या गोष्टी अनुकूल असल्या तरी शेवटी नवराबायकोचं न पटण्याची शक्यता असतेच.

Not at all. Even if all other factors are favorable finally there is the possibility of the husband and wife not getting along.

१ : पण प्रेमविवाहात नवराबायकोचं जरी समजा पटलं तरी बायकोचं सासरच्या माणसांशी पटेलच असं नाही. शेवटी आपल्या भारतीय कुटुंबपद्धतीत मुलीला संबंध कुटुंबाशी जमवून घ्यावं लागतं. नुसता राजाराणीचा मामला नसतो.

But in a love marriage even suppose a husband and wife get along, there is no guarantee that the wife will get along with her in-laws. After all, in the Indian marriage system a girl has to get along with the whole family. It's not just a husband and wife affair.[2]

२ : म्हणजे मुलीचं सासरच्या कुटुंबाशी जमलं म्हणजे झालं, नवऱ्याशी नाही जमलं तर चालेल, असं म्हणायचंय का तुम्हाला?

You mean that as long as the girl gets along with her in-laws that's all that counts, that if she doesn't get along with her husband, that's OK. Is that what you want to say?

Notes

[1] In arranging a marriage the girl's or boy's parents 'see' the prospective match and then decide. Thus to arrange a marriage is referred to as बघून लग्न ठरवणे.

[2] A nuclear family household is often referred to as a राजाराणीचा संसार ('king and queen household').

घटस्फोट – अमेरिकेत व भारतात

Divorce—in the U. S. and India

The following conversation takes place between two women, an Indian and an American. The Indian is the first speaker.

१ : तुमचं लग्न झालंय की नाही ?	Are you married (or not) ?
२ : झालं होतं. आता मी घटस्फोट घेतलेला आहे.	I was. Now I'm divorced.
१ : तुमच्या देशात घटस्फोटाचं प्रमाण खूपच आहे नाही ?	In your country the divorce rate is very high, isn't it ?
२ : हो, पण भारतात सुद्धा काही कमी नाही.	Yes, but in India too it's not all that low.
१ : तुमच्या मानाने कमीच आहे. आम्ही अजून लग्नबंधन पवित्र मानतो.	In comparison to yours, it *is* low. We still consider the tie of marriage sacred.
२ : तुम्ही म्हणजे मध्यमवर्गीय लोक मानीत असतील, पण ग्रामीण भागातले गरीब आणि शहरातले श्रीमंत ह्यांच्यात घटस्फोटाचं प्रमाण खूपच आहे. तुमच्याकडे आकडेवारी उपलब्ध नाही म्हणून नेमकं किती आहे ते सांगता येत नाही एवढंच. शिवाय घटस्फोट न घेतलेली पण एकत्र राहात नसलेली अशी कितीतरी जोडपी असतात.	You—that is the middleclass people—may consider it so, but among the poor in the rural areas and the rich in the cities the rate of divorce is very high. In your country the statistics aren't available, so you can't say exactly what is the rate is, that's all. Besides, there are so many couples living separately without being divorced.

१ : असेल बाई, पण निदान मध्यम-
२० वर्गीयांत तरी आपलं उठलं न् घेतला घटस्फोट अशी नसते लोकांची मनोवृत्ती. थोडं पटलं नाही तरी जमवून घेण्याकडे कल असतो.

That may be, but among middle-class people at least, there isn't the attitude that you can just get up and get a divorce. Even if you don't get along too well, the tendency is to try to adjust.

२ : पण जमवून ध्यायलाही काही मर्यादा
२५ असतात. भांडत भांडत एकमेकांचे वाभाडे काढीत एकत्र राहाण्यापेक्षा सरळ वेगळं झालेलं कधीही बरं नाही का ?

But there are limits to adjustment too. Rather than living together and quarreling and tearing each other to pieces, what's wrong with a straightforward separation?

१ : अशातूनच लग्न ह्या संस्थेचं महत्त्व कमी होत नाही का ?

In that way doesn't the institution of marriage lose its importance?

३० २ : झालं तर झालं. शेवटी ही संस्था माणसानेच निर्माण केलेली आहे ना ? मग माणसांना तिचा उपयोग नाहीसा झाला, तिचं बंधनच वाटायला लागलं, तर ती त्यांनी झुगारून दिली म्हणून
३५ कुठे बिघडलं ?

What if it does? ('If it does it does.') Finally, this institution has been created by man, hasn't it? Then when it ceases to be useful to men, when they begin to feel it as a burdensome restriction, then what's wrong in their throwing it off?

१ : मला नाही हे पटत. लग्नावर तर कुटुंबसंस्था आधारलेली आहे, आणि तीच ढासळली तर समाजात स्थैर्य तरी कसं राहाणार ?

I don't agree. The institution of the family is based on marriage, and if that crumbles how is stability going to remain in the society?

४० २ : समाजात स्थैर्य राखण्याची फक्त एकच रीत असू शकते असं का मानायचं ?

Why assume that there is only one means of maintaining stability in the society?

EDUCATION

कॉलेज – अभ्यासासाठी की गमतीसाठी?

College—for Study or Fun?

१ : काय वाचतेस?

What are you reading?

२ : हिस्टरीचं गाइड आहे. सरांनी आपल्याला महत्त्वाचे म्हणून प्रश्न दिलेत ना, त्यांची उत्तरं पाठ करत्येय.

It's a history guide. I'm memorizing the answers to the important questions Sir gave us ('the questions Sir gave us as important').

१ : बापरे, एवढं सगळं पाठ करणार तू?

Heavens, you're going to memorize all that?

२ : त्याशिवाय आपल्या काही लक्षात राहात नाही बाई.

Unless I do that I can't remember anything.

१ : अगं, पण वर्षभर टेक्स्ट वाचून काहीच कसं लक्षात राहात नाही?

But after reading the textbook all year how can you not remember anything?

२ : वाचलंय कुणी टेक्स्ट?

Who's read the textbook?

१ : म्हणजे तू वर्षभर काहीच अभ्यास केला नाहीस?

You mean you haven't done any studying all year long?

२ : हेः! कोण वेळ घालवतंय एवढा? परीक्षा आली की गाइड असतंच.

Who wastes all that time? When the exam comes the guide is always there.

१ : पण अशानं त्या विषयाचं ज्ञान होतच नाही.

But that way you don't acquire any knowledge of the subject.

२ : इथं कुणाला हवंय विषयाचं ज्ञान व्हायला? ते तुझ्यासारख्यांचं डिपार्टमेंट आहे. आम्हाला नुसतं परीक्षा पास होण्यात रस असतो.

Who wants to acquire knowledge of the subject? That's the department of people like you. We're interested only in passing.

१ : आपण शिकतो त्या विषयात काहीच इंटरेस्ट वाटत नाही तुला ?

Don't you feel any interest in the subject you're studying?

२ : खरं म्हणजे नाही. माझी तितकी बुद्धीही नाही. आणि समजा असली तरी अगदी रस घेऊन शिकून तरी काय दिवे लावायचेत आम्हाला ? कुठलीतरी कारकुनी नोकरी नाहीतर लग्न. तुझ्यासारखी करियर थोडीच असणार आहे मला ? मग कशाला एवढा जिवाचा आटापिटा करून अभ्यास करायचा ? परीक्षेपुरता करायचा. उरलेला वेळ मजा मारायची. नाहीतर कॉलेजात जाण्यात काय गंमत ?

To tell the truth, no. I don't have all that much intelligence either. And supposing I did, and really studied, what great things am I going to do? Get some clerical job or get married. I am certainly not going to have a career like you. Then why should I knock myself out studying? I'll study just for the exam, and have fun the rest of the time. Otherwise, what's the point in going to college?

सर्वज्ञ शिक्षक

The Omniscient Teacher

A visiting American student discusses with his Indian friend a class that he has just attended in the friend's college.

रमेश : कसं काय आवडलं लेक्चर तुला ?

How did you like the lecture?

स्टीव्ह : बरं होतं.

It was all right.

रमेश : तुमच्याकडे अशाच पद्धतीनं वर्ग चालतात का ?

Are classes conducted ('do classes run') the same way in your country?

स्टीव्ह : नाही. मुख्य म्हणजे वर्गात इतके विद्यार्थी नसतात. आणि प्रोफेसरने व्याख्यान द्यायचं न् मुलांनी ते नुसतं बसून ऐकून घ्यायचं असं सहसा कधी होत नाही. कधी प्रोफेसर प्रश्न विचारतात, मुलांना शिकवलेलं समजलंय की नाही ते बघायला. किंवा विद्यार्थी प्रश्न विचारतात त्यांना काही शंका असली तर. बरेचदा मतभेद मांडले जातात, चर्चा होते. प्रोफेसर आणि विद्यार्थी ह्यांच्यात देवघेव होत असते.

No. The main thing is that there aren't so many students in a class. And generally it doesn't happen that the professor lectures and the students just sit and listen. Sometimes the professor asks a question to see if the students have understood what has been taught, or the students ask questions if there's something that's not clear.[1] Often differences of opinion are expressed, and there is a discussion. There is give-and-take between the professor and the students.

रमेश : बापरे, इथे विद्यार्थ्यांनी मधेच शंका विचारलेल्या सुद्धा बहुतेक प्रोफेसरांना आवडणार नाहीत, मग मतभेद मांडणं तर दूरच राहिलं. एखादा

Boy, here, leave alone expressing a difference of opinion, even if students interrupt with questions most professors aren't going to like it.

विद्यार्थी वाद वगैरे घालायला लागला तर त्याला वर्गातनं हाकलूनच दिलं जाईल.

If a student started to argue he would be kicked out of class.

स्टीव्ह : असं का पण ?

But why?

२५ रमेश : कारण इथे प्रोफेसरांची आपण सर्वज्ञ आहोत अशी कल्पना असते. त्या कल्पनेला धक्का बसलेला त्यांना सहन होत नाही.

Because here professors have the idea that they are omniscient. They can't bear that idea receiving a blow.

स्टीव्ह : उलट आपल्या विद्यार्थ्याने ३० एखादी अचूक शंका विचारली किंवा आपल्यालाही माहीत नसलेला एखादा मुद्दा मांडला तर प्रोफेसरांना अभिमान वाटला पाहिजे.

On the contrary, when his student asks a sharp ('accurate') question or makes a point even the professor doesn't know, the professor should be proud.

रमेश : इथे असा विद्यार्थी आपला ३५ अपमान करतो आहे किंवा व्याख्यानाच्या ओघात मुद्दाम व्यत्यय आणतो आहे किंवा विनाकारणच स्वत:चा शहाणपणा दाखवतो आहे असं प्रोफेसरांना वाटण्याचीच जास्त ४० शक्यता.

Here it is more likely that the professor will feel that the student is insulting him or deliberately obstructing the flow of the lecture, or that he is unnecessarily showing off his own cleverness.

स्टीव्ह : शिवाय मी पाहिलं तर लेक्चर चालू असताना आपल्याला महत्त्वाचे वाटतील ते मुद्दे विद्यार्थी लिहून घेत नव्हते. बहुतेकजण फक्त प्रोफेसरांनी ४५ फळ्यावर लिहिलं तेवढंच उतरवून घेत होते.

Also I noticed that while the lecture was going on the students weren't taking down the points they thought were important. Most of them were only copying what the professor wrote on the board.

रमेश : तसंच असतं. विद्यार्थी स्वत:च्या स्वत: नोट्स काढीतच नाहीत. म्हणूनच सविस्तर नोट्स् फळ्यावर ५० लिहून देणारे प्रोफेसर जास्तीत जास्त लोकप्रिय असतात.

That's the way it is. Most students don't take notes on their own. That's why the professors who write detailed notes on the board are the most popular.

स्टीव्ह : आश्चर्य आहे. खरं म्हणजे शिक्षणाचा हेत् बुद्धीला प्रगल्भ बनवणं, विद्यार्थ्यांच्यात स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्ती उत्पन्न करणं हा असायला पाहिजे.

Amazing. Really the purpose of education should be to mature the intellect and to create in students the power to think for themselves.

रमेश : इथे त्याच्या उलट होतं. जो विद्यार्थी शिक्षकाच्या ओंजळीने पाणी पितो, त्यानं सांगितलेलं त्याच्याच शब्दांत पेपरात लिहितो तो सर्वांत उत्तम समजला जातो. जो स्वतंत्र बुद्धी दाखवायला जातो त्याच्यावर विक्षिप्तपणाचा शिक्का मारला जातो. आणि विद्यार्थीही ह्या मनोवृत्तीविरुद्ध बंड करीत नाहीत, कारण बहुतेकांचं ध्येय फक्त परीक्षा पास होण्याचं, डिग्री मिळवण्याचं असतं. खरोखर काहीतरी शिकण्याची, ज्ञान मिळवण्याची कुणाची इच्छा नसते.

Here the opposite happens. The student who allows himself to be spoon-fed ('who drinks water from teacher's hands'), who writes in the exam what the teacher has said, in the teacher's own words—he's considered the best of all. The student who tries to show independence of mind is labeled eccentric ('on him the label of eccentricity is stamped'). And students too do not revolt against this attitude, because the aim of most of them is only to pass the exam and get a degree. Nobody is interested in really learning something, in acquiring knowledge.

स्टीव्ह : आमच्याकडे सुद्धा बरेच विद्यार्थी असे असतात, पण दुसऱ्या तऱ्हेच्या विद्यार्थ्यांचंही प्रमाण बरंच मोठं असतं. तुमच्याकडे सगळेच विद्यार्थी स्वतंत्र विचार न करणारे असतात का?

In our country too there are many students like that, but there are also many ('a large proportion') of the other type. Are all the students in your country the kind who don't think independently?

रमेश : जवळजवळ.

Just about.

स्टीव्ह : का?

Why?

रमेश : कुणास ठाऊक. कदाचित गुरूसमोर बसून तो सांगेल ते नुसतं आत्मसात करायचं अशीच कल्पना आम्ही धरून बसलो म्हणून असेल.

I don't know. Maybe it's because we've held on to the idea that you sit before a guru and just absorb ('make one's own') what he says.

Notes

[1] शंका is usually translated as 'doubt' or 'suspicion.' In this context the meaning is 'lack of clarity on a certain point' or 'a question asked in order to get clarification.'

पोट भरण्याचा राजमार्ग

The Royal Road to Earning a Living

१ : आत्ता बाहेर गेला तो अभयच ना तुमचा ? मी ओळखलंच नाही. उंच झालाय पुष्कळ. आणि मला म्हणाला गुड मॉर्निंग आंटी. म्हटलं हा काय प्रकार आहे ?

The boy who just went outside is your (son) Abhay, isn't he? I didn't recognize him. He's gotten very tall. And he said to me, "Good morning, Auntie." I thought, what is this? ('I said, what sort of thing is this?')

२ : इंग्लिश मीडियम शाळेत जातो ना आता. शिवाय बोर्डिंगात सगळी इकडच्या तिकडच्या प्रांतांतली मुलं. तेव्हा मराठी बोलायची सवयच गेलीय त्याची. मी म्हणते मला तुझं कळत नाही, तर अडखळत मराठी बोलतो माझ्याशी !

He goes to an English medium school now. Besides, in the dormitory there are kids from all over ('from this state and that of') the country. So he's gotten out of the habit of speaking Marathi ('his habit of speaking Marathi has gone.') I tell him I can't understand him, so he falteringly speaks to me in Marathi !

१ . मग ह्याचं तुम्हाला वाईट वाटत नाही ?

Don't you feel bad about that ?

२ : वाईट काय वाटायचंय त्यात ? उलट इंग्रजी कसं फाडफाड बोलतो म्हणून कौतुकच वाटतं.

What's there to feel bad about in that? On the contrary I feel proud at the way he rattles off English.

१ : तुमचा त्याचा संपर्क कमी होत जाणार, पुढे मागे कदाचित तुम्हाला फारसं इंग्रजी बोलता येत नाही म्हणून तुम्हाला तो कमी लेखणार अशी भीती नाही वाटत तुम्हाला ?

Aren't you afraid that you and he will go on having less and less contact with each other, that sooner or later he will think less of you because you can't speak English very well ?

२ : नाही बाई.

Not at all.

१ : आणि मराठी भाषेबरोबरच मराठी संस्कृतीशीही त्याचा संबंध तुटतोय ह्याबद्दलही तुम्हाला काही वाटत नाही ?

And don't you feel bad about the fact that he's losing touch with Marathi culture along with the Marathi language?

२ : अहो कसली संस्कृती घेऊन बसलात ? ह्या जमान्यात सगळ्या संस्कृतींचं कडबोळंच झालंय नाहीतरी. आणि पोटाचा प्रश्न संस्कृतीपेक्षा जास्त महत्त्वाचा. अलिकडे इंग्रजी उत्तम येत असेल त्यांनाच किंमत आहे. चांगल्या मोठ्या पगाराच्या नोकऱ्या त्यांनाच मिळतात. बरं, स्वत:चा काही धंदा काढला तरी चांगलं इंग्रजी बोलता आलं की छाप पडते एकदम लोकांवर. आम्ही मुलांना थोडीच इस्टेट ठेवणार आहोत ? तेव्हा आत्ता सगळ्यात उत्तम शिक्षण देणं हेच महत्त्वाचं आहे.

What can one want with culture ? In this day and age all cultures are a mixture[1] anyway. And earning a living ('the problem of the belly') is more important than culture. Nowadays only people who know excellent English have any standing. They are the ones who get the good jobs with high salaries. And even if you start your own business people are immediately impressed ('an impression immediately falls on people') if you speak English well. We're not going to leave our children any big estate. So the important thing is to give them the best education (possible).

१ : एकवेळ तुम्ही म्हणता तसं इंग्रजीचं महत्त्व मानलं तरी इंग्रजी मीडियमच्या शाळेतच जायला पाहिजे इंग्रजी शिकायला असं कुठे आहे ?

Even granting for the moment what you say about the importance of English, since when do you have to go to an English medium school to learn English?

२ : इतर शाळांतून शिकवतात, पण ते काही खरं नाही. बहुतेक शाळांतनं गचाळच शिकवतात, आणि ज्या शाळांत चांगलं शिकवतात तिथे सुद्धा नुसतं पुस्तकी इंग्रजी शिकवतात. तिथली मुलं परीक्षेत नंबर मिळवतील, पण त्यांना सराईतपणे बोलता येत नाही.

They teach it in other schools but that's meaningless ('that's not genuine'). In most schools they teach it badly and even in the schools where they teach it well they teach only bookish English. The students may get a high rank in the examination but they can't speak fluently.

Notes

[1] A कडबोळं is a fried savory consisting of a mixture of various grains. It is used as a metaphor for any mixture of unrelated things.

ग्रामीण विभागात इंग्रजी मीडियम

English Medium in the Rural Areas

१ : हल्ली अगदी खेडोपाडी सुद्धा इंग्लिश मीडियमच्या शाळा निघायला लागल्या आहेत आणि तिथले लोक सुद्धा मोठमोठाल्या फिया भरून आपल्या मुलांना त्या शाळांत पाठवतात ही भयानक गोष्ट आहे.

It's terrible ('a terrible thing') that these days even in villages English medium schools have started and people there too pay huge fees and send their children to these schools.

२ : भयानक काय त्यात ?

What's so terrible about that?

१ : ही गोष्ट केवढी गुलामगिरीची मनोवृत्ती दर्शवते. जगात कुठेही मुलं अहमहमिकेनं आपली मातृभाषा सोडून दुसऱ्याच कुठल्या तरी भाषेच्या माध्यमातून शिक्षण घेऊ पाहात नाहीत.

It displays such a slavish mentality. Nowhere else in the world do children strive to get an education through the medium of a language other than their mother tongue.

२ : आपल्या इतिहासानं आपल्यावर इंग्रजी लादलेली आहे. तेव्हा ती आता आपलीच भाषा झाली खरं म्हणजे.

Our history has imposed English upon us. So now actually it's become our language.

१ : भारतातल्या अनेक भाषांतली ती एक आहे हे तर खरंच, पण तरीसुद्धा इथल्या बहुसंख्य लोकांची ती मातृभाषा नसते. आणि मातृभाषेखेरीज दुसऱ्या कुठल्या तरी भाषेतून शिकणं हे अनैसर्गिक आहे.

It's true that it's one of the many languages of India, but still it is not the mother tongue of most of the people in this country. And studying through a language other than one's mother tongue is unnatural.

२ : आज मोठ्या शहरांतून सुशिक्षित, ज्यांना समाजाचे नेते म्हणावं असे

Today the educated people in cities, those who can be called the leaders of the society, are sending

लोक आपल्या मुलांना अशाच शाळांतून पाठवतायत ना? मग खेडोपाडीच्या लोकांनाही तसंच करावंसं वाटलं तर त्यात काय आश्चर्य आहे? इंग्रजी भाषा ज्यांना येते त्यांना मान, पैसा सगळं मिळतं असं त्यांना दिसतं. तेव्हा आपल्या मुलांनाही अशी संधी मिळावी असं त्यांना वाटणं साहजिकच आहे.

१ : पण त्यात दुर्दैवाने त्यांचा तोटा होण्याची शक्यता आहे. एकतर खेड्यांतल्या शाळांतून शहरांतल्या शाळांइतकं उत्तम इंग्रजी शिकवणारे शिक्षक नसतात. शिवाय इंग्रजी जाणणाऱ्या कुटुंबांतल्या मुलांच्या घरीही इंग्रजीला पोषक वातावरण असतं. इंग्रजी बोललं जातं, घरात इंग्रजी वर्तमानपत्रं, पुस्तकं असतात. खेड्यांतल्या मराठी कुटुंबांचं तसं नसतं. मूल शाळेतनं घरी आलं की त्याचा इंग्रजीशी संपर्क तुटतो. अशामुळे त्याचा इंग्रजीचा पाया कच्चा राहाण्याचा संभव असतो. चारपाच वर्षं शिकून सुद्धा इंग्रजीतून इतर विषय शिकण्याइतकं इंग्रजी ते आत्मसात करू शकत नाही. परिणामी त्याचे इतर विषयही कच्चे राहातात. आणि इंग्रजीच्या मागे लागल्यामुळे त्याच्या एकूण शिक्षणाचं नुकसान होतं.

their children to such schools, aren't they? Then what's so surprising if people in villages also want to do the same? They see that those who know the English language get respect, money, everything. Then it's only natural that they should feel that their children too should have this opportunity.

But unfortunately there's a possibility of their being the losers ('of their loss'). For one thing, in village schools there aren't teachers who teach English as well as the teachers in cities. Besides there is an atmosphere conducive to (the learning of) English also in the homes of children of English-knowing families. English is spoken. There are English newspapers and books in the house. This is not the case ('it is not like that') with Marathi-speaking families in the villages. When the child comes home from school its contact with English is cut off. Because of this it is likely to get a poor foundation in English ('there is a likelihood of his foundation in English remaining weak'). Even after studying English for four or five years it cannot master English enough to learn other subjects through it. As a result it remains weak in its other subjects too ('its other subjects remain weak'). And on account of having gone after English its whole education suffers.

५५ १ : तुमचं म्हणणं खरं असेल कदाचित. पण आता इंग्रजीमुळेच आपलं भलं होईल ही कल्पना लोकांच्या डोक्यांत इतकी घट्ट मूळ धरून बसली आहे की हा ओघ थांबवणं अशक्य आहे.

What you say is true perhaps. But now the idea that English will better their lot has so firmly taken root in people's minds that it is impossible to stem the tide ('stop the current').

ENTERTAINMENT

सिनेमातील हिंसाचार

Violence in the Cinema

अनुराधा : शोले पाहिलास का शेवटी ?

Have you finally seen *Sholay*?

रेवती : हो, कालच गेलो होतो आम्ही बघायला.

Yes, we went to see it just yesterday.

अनुराधा : मग कसा काय आवडला ? मस्त आहे की नाही ?

Then how did you like it? It's great, isn't it?

रेवती : तांत्रिक दृष्टया छानच आहे. अभिनयही बरा आहे. पण त्यात जे हिंसाचाराचं स्पष्ट दर्शन आहे ते नाही मला आवडलं.

Technically it's very good. The acting too is all right. But I didn't like the graphic portrayal of violence in it.

अनुराधा : मला तर फार आवडला शोले. इतकं पॉलिश्ड दिग्दर्शन, फोटोग्राफी क्वचितच पाहायला मिळते हिंदी चित्रपटांत.

As for me, I really liked *Sholay*. You seldom get to see such polished direction or photography in Hindi movies.

रेवती : मी म्हटलं ना तंत्रदृष्टया छान आहे म्हणून. पण तंत्राइतकाच चित्रपटाचा आशयही महत्त्वाचा आहे असं मला वाटतं.

I said, didn't I, that technically it's very good. But I think that in a movie content is as important as technique.

अनुराधा : आशय कसला त्यात ? एक सरळसोट गोष्ट आहे. त्यात काही विशेष सामाजिक जाणीव किंवा कसलीतरी भोंदू मूल्यं वगैरे ओढून-ताणून आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. खरं म्हणजे ही मला ह्या सिनेमाबद्दल आवडलेली एक गोष्ट आहे.

What sort of content can there be in it? It's a straightforward story. No attempt has been made to drag in any sort of special social awareness or hypocritical values. Actually, that's one of the things I liked about the movie.

रेवती : ते सगळं कबूल ग, पण हे सरळसोट गोष्टच ज्या तऱ्हेनं हाताळलीय त्यातून हिंसाचार, रक्तपात, सूडबुद्धीनं वागणं ह्या गोष्टींत काहीतरी रोमँटिक आहे, ग्लॅमरस आहे असा सूर निघतो. बॉनी अँड क्लाइड पाहून मला असंच वाटलं होतं. आणि एका तऱ्हेने शोलेच्या तांत्रिक बाजू उत्तम आहेत म्हणून तो जास्तच वाईट. कारण फालतू हिंदी सिनेमातला हिंसाचार, मारामाऱ्या, गुंडगिरी हे आपल्याला खरं वाटत नाही. त्यात एक फार्सचा धागा असतो. पण शोलेसारख्या चित्रपटातला हिंसाचार मनावर जास्त परिणाम करून जातो. मला नाही वाटत अशा तऱ्हेचे चित्रपट तयार व्हावेत म्हणून.

I admit all that, but the way this straightforward story has been handled the tenor is that ('the note comes through') there is something romantic and glamorous about violence, bloodshed, and revenge ('behaving with revenge'). I felt the same way when I saw *Bonnie and Clyde*. And in a way, *Sholay* is all the more pernicious because its technical aspects are excellent. Because in an ordinary third-rate Hindi movie the violence, fighting, and hooliganism don't seem real. There's an element ('thread') of farce in it. But the violence in a movie like *Sholay* makes more of an impression on the mind. I don't feel that such pictures ought to be made.

अनुराधा : हे चित्रपट बघून बाहेर पडून लोक हिंसाचार करायला लागतात असं नाही ना तुला म्हणायचं ?

You don't mean to say, do you, that people see these movies and come out and start to commit violence?

रेवती : अगदी तसंच नाही, पण असे चित्रपट, असं वाङ्मय ह्यांमुळे समाजात हळूहळू हिंसाचाराविषयी एक विशिष्ट मनोवृत्ती तयार व्हायला लागते, त्यात काही विशेष वाटेनासं होतं किंवा त्यातच पुरुषार्थ वाटायला लागतो. शिवाय लोक निर्ढावतात. मग खऱ्या हिंसाचाराबद्दल त्यांना चीड वाटेनाशी होते.

Not quite that, but because of such movies and such literature, a certain attitude toward violence slowly begins to develop in society. People begin to feel that there is nothing out of the ordinary about it or that that's what constitutes real manliness. Moreover, people become insensitive. Then they no longer feel anger at real violence.

अनुराधा : हे मात्र अगदी सुताने स्वर्गाला जाणं झालं हं. शोले नावाचा कुठला एक सिनेमा, आणि त्याचा समाजावर इतका दूरगामी परिणाम होतो !

रेवती : एका सिनेमाचा नाही, पण तो इतका यशस्वी झाला की त्यामुळे एक पायंडा पडतो. इतरही तसेच चित्रपट काढायला बघतात. त्यापेक्षाही जास्त स्पष्टपणे हिंसाचार दाखवतात. आणि मग हळूहळू सगळ्याच कला आणि वाङ्मयप्रकारांत त्याचं लोण पसरतं.

अनुराधा : पसरलं तर पसरलं. इतर फॅशन्ससारखी हीही एक फॅशनच. थोड्या दिवसांनी ती जाऊन दुसरी येईल. मला नाही वाटत ही गोष्ट इतकं महत्त्व देण्याजोगी आहे म्हणून.

That's really jumping to conclusions ('going to the heavens on a thread'). Just a single movie named *Sholay* and it has such far-reaching effects on society?

It's not a question of one movie. But because this movie is so successful it starts a trend. Others try to make the same type of movies. They portray violence even more openly. And then slowly its influence spreads to all arts and all forms of literature.

If it spreads it spreads. Like other fashions this too is a fashion. After a while it will go and another will come. I don't feel that this thing is worth giving so much importance.

मैफल

A Vocal Recital

An American student in India writes to her mother about attending a vocal recital.

प्रिय आई,

काल एका गाण्याच्या मैफलीला माझ्या काही मित्रमैत्रिणींबरोबर गेले होते. गाणं अर्थातच काही समजलं नाही, पण तरी मैफलीची गंमत वाटली. इथली मैफल आपल्याकडल्या शास्त्रीय संगीताच्या मैफलीपेक्षा अगदीच वेगळी असते. इथे सगळंच अनौपचारिक असतं. श्रोते जमिनीवर अंथरलेल्या सतरंजीवर मांडी घालून बसतात. (इतर सगळ्या ठिकाणी असते त्याप्रमाणे इथेही पुरूष एकीकडे आणि बायका एकीकडे अशी विभागणी असतेच.) गायक श्रोत्यांच्या पेक्षा जराशा उंच अशा बैठकीवर खालीच बसतो.

गाणं चालू असताना लोक " वा वा " वगैरे म्हणून दाद देतात. काही काही उत्साही लोक तर इतका आरडाओरडा करत होते की मला हसूच यायला लागलं. जे आरडाओरडा करीत नाहीत ते सुद्धा हातवारे करतात आणि माना डोलावतात ते बघायला मजा येते. गायक पुष्कळदा एखादी विशेष चांगली तान वगैरे घेतली

Dear Mother,

Yesterday I went to a vocal recital with some of my friends. Of course, I didn't understand the music, but still I enjoyed the recital. A recital here is very different from a classical music recital at home. Here everything is informal. The audience sits cross-legged on carpets spread on the floor. (As everywhere else, here too there is a division between the men on the one side and the women on the other.) The singer sits on a platform slightly higher than the audience.

While the singing is going on people respond by saying things like " Va, Va ! " A few enthusiastic people were shouting so much that I began to laugh. Even those who don't shout wave their hands and nod their heads. It's fun to watch. Often when the singer makes an especially good run or something, he will look at the

की श्रोत्यांकडे वाहवा मिळवण्याच्या अपेक्षेनं बघतो.

ह्या सगळ्या प्रकारामुळे मैफलीच्या वातावरणातला गंभीरपणा जातो हे खरं असलं तरी एका तऱ्हेने श्रोत्यांचाही मैफल रंगवण्यात प्रत्यक्ष भाग असतो ही चांगली गोष्ट वाटली. श्रोत्यांची दाद मिळत जाते तसं गाणं रंगत जातं. कारण इथे शास्त्रीय संगीतात गायक काय गाणार हे ठरलेलं नसतं. स्वरांचे विशिष्ट गट असतात त्यांना राग म्हणतात. त्या स्वरांच्या चौकटीत गायक कोणत्याही तऱ्हेने मांडणी करू शकतो. एखादा विशेष कसलेला गायक एखाद्या रागात घेतला न जाणारा स्वर किंवा स्वरांची रचनाही वापरतो. ह्यामुळे एकच गायक दोनदा तोच राग गाताना वेगळ्या तऱ्हांनी गाऊ शकतो. एकंदर गायनातून स्वरांच्या रचनेच्या सफाईपेक्षा जास्तच भर भावनेच्या परिपोषावर दिला जातो असं मला वाटतं. प्रत्येक रागाची वेळ ठरलेली असते तशी त्यातून व्यक्त होणारी भावनाही ठरलेली असते.

एकूण हा सगळा प्रकार म्हणजे मला अगदी नवीनच अनुभव होता. पुन्हा संधी मिळाली तर मी आणखी मैफलींना जरूर जाणार आहे.

audience expecting to receive applause.

Although it is true that because of all this the seriousness of the atmosphere of the recital is lost, in a way I liked the fact that the audience has a direct part in making the recital a success. The more response is received from the audience, the better the singing becomes. Because here in classical music the singer does not sing a fixed composition ('what the singer is going to sing is not fixed'). A particular set of notes is called a *rag*. Within the fixed structure of the *rag*, the singer can improvise as he likes ('can make a composition in any way'). An especially practiced singer can even use a note or a sequence not belonging to that *rag*. Because of this, the same singer singing the same *rag* twice can sing it in different ways. On the whole, I think, more importance is given to fidelity to the emotion of the *rag* than to the singer's technical skill ('skill in composition'). Just as there is a fixed time for every *rag* to be sung, the emotion to be expressed through it is also fixed.

This whole thing was altogether a completely new experience. When I get a chance again I'm definitely going to some more recitals.

५०
माझं इथे छान चाललं आहे हे माझ्या पत्रांवरून तुला समजलंच असेल. उद्या मी दोन-तीन दिवसांसाठी बडोद्याला जाते आहे. परत आल्यावर पुन्हा लिहीन.

तुझी
मार्गरेट
५५

You must have gathered from my letters that everything is going well for me here. Tomorrow I am going to Baroda for two or three days. I'll write again when I come back.

Yours,
Margaret

WEATHER AND SEASONS

हिवाळ्याची थंडी

Winter's Cold

लॉरा : इथे इतकी थंडी पडते मला माहीत नव्हतं.

I had no idea it gets so cold here.

शैला : आम्हाला वाटते, पण तुमच्या देशाच्या मानाने ही काहीच नव्हे.

We feel it's cold, but in comparison to your country this is nothing.

लॉरा : ते खरंच, पण आमच्या घरांत हीटिंग असतं, त्यामुळे ऊब येते. इथे घरात विशेषत: रात्री खूप थंडी वाजते.

That's true, but in our houses there's (central) heating, so it's warm inside. Here, in the house—especially at night—you feel very cold.

शैला : ते आमच्या खिडक्या उघड्या असतात म्हणून. काही लोक खिडक्या-दारं पार पॅकबंद करून झोपतात, मग त्यांना नाही इतकी थंडी वाजत.

That's because our windows are open. Some people sleep with the windows and doors closed tight ('close the windows and doors tight and sleep') so they don't feel so cold.

लॉरा : मी राहते तिथल्यापेक्षा इथली हवा कोरडीही आहे खूप.

The air here is also a lot drier than where I live.

शैला : हो ना, त्यामुळे हिवाळ्यात अंग, तोंड खूप फुटतं. तेल, क्रीम काहीतरी वापरावं लागतं. ज्यांना असं काही वापरणं परवडत नाही त्यांच्या हाता-पायाला भेगा पडतात, अंग, तोंड बगैरे फुटल्यामुळे पांढरं दिसायला लागतं. तू पाह्यलंस का?

Yes, and because of that your body and face chap. You have to use oil, cream, or something. Those who can't afford to use such things get cracks in their hands and feet and their skin ('their bodies and faces') begins to look white due to chapping. Have you seen this?

लॉरा : हो. आपल्याकडे कामाला सरूबाई येते तिचं अंग तसंच दिसतं. गरीब-गुरिबांना हिवाळा नको वाटत असेल नाही !

Yes, Sarubai who works at our house—her body looks like that. The poor must dread winter (' must feel they don't want winter '), mustn't they?

शैला : तर काय. गरम कपडे तर नसतातच. शिवाय सकाळी उठून थंडीत घराबाहेर पडावं लागतं, काम करावं लागतं, गार पाण्यात धुणीभांडी करावी लागतात. उन्हाळा परवडला पण हिवाळा नको असं त्यांना वाटत असणार.

Yes indeed. In the first place they don't have any warm clothes. On top of that, in the morning they have to get up and go outside in the cold, have to work, and have to do washing and scouring in cold water. They must feel that summer they can take but not winter.

लॉरा : मला इथला उन्हाळाच नको वाटतो, आणि हिवाळा आवडतो.

It's the summer here that I can't stand, and I like the winter.

शैला : आमच्या देशात उत्तरेकडे मात्र खरीखुरी थंडी पडते. बर्फसुद्धा खूप पडतं. पण तरीही तिथल्या लोकांची घरं युरोप-अमेरिकेतल्या घरांच्या मानाने थातुरमातुरच असतात. काही लोक तर अगदी झोपड्यांतनं सुद्धा राहतात. ते कसे हिवाळ्यात जगत असतील देव जाणे.

In our country it's really cold in the North, though. There's a lot of snow too. But even so people's houses there are makeshift in comparison to European or American houses. Some people live in just huts. God knows how they survive the winter.

हिवाळा

Winter

हिवाळा. हुडहुडी भरवणारी पण तरीही हवीशी वाटणारी सुखद थंडीची बोच (अर्थात पुरेशी गरम कपडे, पांघरुणं असली तर). कधी नुकत्याच पहून गेलेल्या हिवाळी पावसाची ओल हवेत असली की सगळा परिसर सकाळी धुक्यात बुडलेला असतो. मग वाफाळत्या कपाभोवती तळवे लपेटून खिडकीतनं हलकेच तरंगत येणारं धुकं बघत चहाचे घुटके घ्यायला मजा येते. सूर्याचे उबदार किरण धुकं निपटतात तसतशी झाडं, घरं, वहानं, माणसं प्रथम धूसर आणि हळूहळू स्पष्ट आकार घ्यायला लागतात तेव्हा मात्र आपण एका गूढ धूसर जगातून एकदम जमिनीवर येऊन आदळतो.

पावसाचा हवेत राहिलेला उरलासुरला ओलावा संपला की ही थंडी कुरकुरीत बनते – गजऱ्या पेरूच्या घासासारखी. मग दिवसामागून दिवस निळंभोर आकाश, त्याचा निळेपणा जास्तच जाणवावा इतपत कुठेतरी दिसणारा एखादा पांढरट ढगाचा तुकडा, आणि रात्रीमागून रात्री ताऱ्यांनी चितारलेल्या. पहाटे सगळ्याभर पेटलेल्या शेकोट्यांच्या धुराचा वास आणि रात्री जळणाऱ्या पाचटाच्या उंच झेपावणाऱ्या लाल-केशरी ज्वाळा नि वाऱ्याबरोबर येणारा

Winter. The pleasant sting of the cold which, though it makes you shiver, is welcome (of course only if you have enough clothes and blankets). Sometimes when the moisture from a recent winter shower is still in the air, your surroundings are engulfed by mist. At such a time it is lovely to wrap your hands around a steaming cup and sip your tea while watching the mist lightly floating in the window. As the warm rays of the sun wipe off the mist, trees, houses, vehicles, people start to take first indistinct and then slowly clear shape. Then you come out of a mysterious veiled world and dash down to earth.

When the moisture remaining in the air from the rain has gone, the cold becomes crisp like a bite out of a half-ripe guava. Then day after day there is a blue sky, with an occasional whitish wisp of a cloud here and there only serving to stress the blueness. And night after night studded with stars. At dawn the smell of smoke from the warming fires[1] lit everywhere, and at night the red-orange flames from burning sugarcane trash leaping high, and on the breeze the

गुऱ्हाळाचा गोड खमंग वास.

हळूहळू ही कडक कोरडी थंडी जमिनीतलाही ओलावा शोषून घेते. गवत पिवळं पडून वाळून जातं. माती कोरडी पडून तिचा फुफाटा होतो. झाडांची पानं सुकून गळायला लागतात. सगळं शुष्क, रुक्ष, पावसासाठी आसुसल्यासारखं दिसायला लागतं. आणि मग हिवाळ्याचा अलगद उन्हाळा कधी होतो कळत सुद्धा नाही. हिवाळ्यासाठी दक्षिणेकडे आलेले पक्षी आपापल्या मुलखाला निघून जातात, धूळ बसलेली जुनी पानं जाऊन त्यांच्या ठिकाणी लुसलुशीत पोपटी पालवी फुटते, बाजारात कैऱ्या दिसायला लागतात आणि लक्षात येतं, अरे, हिवाळा तर कधीच निघून गेलाय.

delicious sweet smell of the *gurhal*.[2]

Slowly this harsh dry cold sucks up even the moisture in the ground. Grass yellows and dries. Soil dries up and becomes dust. Leaves of trees dry up and start falling. Everything looks parched and arid, as if longing for rain. And then you are not even aware of when winter shades imperceptibly into summer. The birds that had come south for the winter set out for their own lands, the dusty old leaves fall and in their place tender light green leaves burst out, green mangoes begin to appear in the market, and suddenly you realize that the winter's been gone for quite a while.

Notes

[1] शेकोट्या are small fires people build to keep warm in winter.

[2] A *gurhal* is a jaggery-making plant.

उन्हाळा

Summer

१ : इथला उन्हाळा कधी असतो ?

२ : एप्रिल आणि मे मधे. तू अगदी योग्य वेळी इथे आलायस. आत्ता जूनमधे उन्हाळ्याची तीव्रता जरा कमी व्हायला लागलेली असते.

१ : आमचा उन्हाळा तर जूनमधे सुरू होतो आणि तो ऑगस्टपर्यंत टिकतो.

२ : इथला उन्हाळा जूनमधे संपतो कारण मॉन्सूनचे वारे सुरू होतात आणि ढग जमा व्हायला लागतात. भारतात सुद्धा उत्तरेकडे जुलै-ऑगस्ट-मधे उन्हाळाच असतो.

१ : इथला उन्हाळा खूप कडक असतो का ?

२ : हो, बराच. तपमान साधारण एके-चाळीस-बेचाळीस सेंटिग्रेडपर्यंत जातं. दुपारी उन्हाने खूप तलखी होते. पण सुदैवाने संध्याकाळी वारा सुटतो आणि रात्री बरंच गार होतं. पुण्या-सारख्या ठिकाणी तुम्ही जर बाहेर झोपलात तर भर उन्हाळ्यातसुद्धा पहाटे चांगला गारठा वाटतो. ह्याउलट विदर्भात किंवा राजस्थान, दिल्ली इकडे रात्रीचं तपमान फार खाली उतरत

When is the summer here?

In April and May. You've come just at the right time. Just now in June the intensity of the summer begins to decrease a little.

As for our summer, it starts in June and lasts until August.

The summer here ends in June, because the monsoon winds start and the clouds start to gather. In India too in the North it is still summer in July and August.

Is the summer here very hot?

Yes, quite. The temperature generally goes up to forty-one or forty-two Centigrade. In the afternoon the heat burns you up. But fortunately in the evening the breeze starts and at night it gets quite cool. In a place like Pune even at the height of the summer if you sleep outside it feels quite cool by the early hours of the morning. On the other hand in Vidarbha[1] or Rajasthan or Delhi the nighttime temperature doesn't go

नाही. त्या मानाने आम्ही नशीबवान आहोत. तुमच्या देशात उन्हाळा खूप कडक असतो का?

down very much. Compared to that, we're lucky. In your country is the summer very hot?

१ : हो, बऱ्याच ठिकाणी असतो. ॲरिझोना, फ्लॉरिडा, याशिवाय इतरही अनेक राज्यांत खूप उन्हाळा होतो. एवढंच काय, न्यूयॉर्कसारख्या शहरात हेवाळ्यात जरी भयानक थंडी पडते तरी उन्हाळ्यात उकडतंच. तिथला उन्हाळा दमट असल्यामुळे अंगाचा घामघाम होतो.

Yes, in a lot of places it is. In Arizona and Florida and many other states as well the summer is very hot. Not only that, but in a city like New York though it gets terribly cold in the winter, still in the summer it is hot. Because the summer is humid one sweats a lot.

२ : म्हणजे मुंबईसारखा.

You mean like Bombay.

१ : हो. पण मुंबईला अशी हवा वर्षभर असते असं लोक म्हणताना मी ऐकलंय.

Yes, but I've heard people saying that in Bombay the weather is like this all year long.

२ : अगदी वर्षभर नाही, पण वर्षाचे बरेच महिने असतेच. तिथे मॉन्सूनचा पाऊस कोसळत असला तरी हवेत गारवा येत नाही. पण तुला गंमत माहिती आहे का? मी काही पुस्तकांतनं मुंबईबद्दलचे जुने उल्लेख वाचले, त्यांत मुंबई हे अतिशय आल्हाददायक हवेचं, खूप झाडी असलेलं रम्य शहर आहे असं लिहिलेलं सापडलं.

Not quite all year long, but for many months of the year it is. Even when the monsoon rain is pouring down still the air doesn't get cool there. But do you know something interesting? I read some old references to Bombay in some books, and in them I found it written that Bombay is a charming city with a very pleasant climate and a lot of trees.

१ : कदाचित ते खरंही असेल. सिमेंट काँक्रीटचे रस्ते, इमारतींची गर्दी ह्यांमुळे एखाद्या शहराची हवा बदलू शकते.

Perhaps that may even be true Because of concrete roads and crowds of buildings, the climate of a city can change.

२ : पुण्याचंही तसंच झालंय असं लोक म्हणतात.

A lot of people say that's what has happened to Pune.

१ : आपणच आपलं वातावरण किती बिघडवून टाकतो, नाही का ?

We ourselves ruin our environment so much, don't we ?

२ : नाही तर काय. हो, उन्हाळ्याबद्दल आणखी एक जरा विचित्र गोष्ट म्हणजे ऑक्टोबरचा उकाडा. ह्यावेळी मॉन्सून संपलेला असतो आणि हवेत अजून पावसाचा दमटपणा शिल्लक असतो. ह्यावेळी तपमान एप्रिल-मे इतकं चढलं नाही तरी दमटपणामुळे खूप उकाडा भासतो. सुदैवाने हा उकाडा आठ-पंधरा दिवसच टिकतो नि मग हिवाळ्याला सुरुवात होते. ज्याला ह्या हवामानाची माहिती नाही त्याला ऑक्टोबर महिन्यात उकाड्याचं फारच आश्चर्य वाटतं.

Absolutely. By the way, another rather strange thing in connection with summer is October heat. At that time the monsoon has ended and there's still some of the moisture from the rains remaining in the air. At that time though the temperature doesn't get as high as in April and May, it feels very hot because of the humidity. Fortunately, this heat lasts only a week or two ('eight to fifteen days') and then winter begins. A person who doesn't know this climate feels very surprised at heat in October.

१ : बरोबर आहे, कारण आमच्याकडे ऑक्टोबरमधे चांगलीच थंडी पडायला सुरुवात होते.

That's right, because in our country it starts to get quite cool in October.

Note

[1]Vidarbha is the northeast region of Maharashtra.

CURRENT TOPICS

जळणासाठी झाडे

Trees for Firewood

१ . ह्या बायका इतकं सगळं लाकूड कुठे नेतात ?

Where do these women take all that wood ?

२ : काही विकतात, काही घरी जळण म्हणून वापरायला नेतात.

They sell some of it. Some of it they take home to use as firewood.

१ : जे लोक विकत घेतात ते जळणासाठीच वापरतात का ?

Do the people who buy it use it for firewood ?

२ : हो. स्वैपाकासाठी तरी किंवा बंब पेटवण्यासाठी.

Yes. For cooking or for lighting the water heater.

१ : इतके सगळे लोक लाकूडच वापरतात ?

All these people use *wood* ?

२ : दुसरं काय वापरणार ? गॅस फार महाग असतो, शिवाय मिळतही नाही. विजेचंही तसंच. रॉकेलही बहुतेकांना महागच पडतं. त्यातून रॉकेलसुद्धा अधूनमधून एकदम गडप होतं. त्यावेळी मग नेहमी स्टो वापरणाऱ्यांनासुद्धा लाकूड किंवा कोळसा वापरावा लागतो.

What else are they going to use ? Gas is too expensive. Besides, it's not even available. The same is true of electricity. Kerosene too is too expensive for most people. Besides, kerosene also suddenly disappears (from the market) now and then. At that time even the people who normally use a kerosene stove have to use wood or coal.

१ : पण इतक्या सगळ्या लोकांनी जळणासाठी लाकूड वापरलं तर इथली झाडं कधीच नाहीशी होऊन जातील.

But if all these people use wood for fuel, the trees here will disappear in no time.

२ : हो ना. म्हणूनच आता जंगलं वाढवण्यासाठी सरकारतर्फे आणि खाजगी उद्योगधंद्यांतर्फे वगैरे पद्धतशीर

Exactly. That's why systematic attempts are being made on behalf of the government and private

प्रयत्न केले जाताहेत. अर्थात झाडं ही काही वर्ष-सहा महिन्यांत वाढणारी वस्तू नव्हे. अगदी भराभर वाढणारी कू-बाभूळ[1] वगैरेसारखी झाडंसुद्धा तोडायला यायला तीन-चार वर्षं जावी लागतात. तेव्हा नवी लागवड कितीही प्रमाणावर केली तरी अजून बरीच वर्षं असलेल्या जंगलांची तोड थांबणं शक्य नाही.

industries and others to increase the forests. Of course, trees are not something that mature in six months or a year. Even really fast-growing trees like ku-babhul[1] and such require three or four years to be ready for cutting. So no matter how much planting is done it will be years before we can stop the cutting down of our present forests.

Note

[1] This is a fast-growing tree which is useful for timber and fuel. Its leaves can be used for cattle fodder and green manure.

जंगलतोड – जबाबदारी कोणाची?

Deforestation — Who Is to Blame?

एकेका विचाराची सुद्धा फॅशन असते. एखाद्या विषयावर कुणीतरी बोलायला लागतं. मग इतर चारजण तो उचलतात. मग कुणी त्याच्यावर लेखबिख लिहितं. करता करता वणवा पसरावा तसे हे विचार सबंध समाजात पसरतात. त्यातून त्यांत आपली सर्वनाशाकडे वाटचाल चालली आहे असा सूर असला तर ते विचार विशेषच वेगाने पसरतात.

There are fashions in ideas too. Somebody begins to talk about a particular subject. Then a few more people take it up. Then somebody writes an article on it. In this way these ideas spread like wildfire through the entire society. Particularly ideas suggesting that we are headed for disaster spread especially rapidly.

तसा हल्ली जंगलतोड हा विषय आहे. जंगलतोडीने निर्माण होणारा धोका आत्ताच एकदम उत्पन्न झाला आहे असे नाही, पण ह्या विषयाचा उहापोह अलिकडेच सुरू झाला आहे एवढं मात्र खरं. जंगलं मोठ्या प्रमाणावर तुटताहेत, लवकरच ती नष्ट होतील, मग पाऊस कमी होईल, जमीन धुपून जाईल आणि आपल्या समृद्ध भूमीचं वाळवंट होईल ही भीती लिहितावाचता येणाऱ्यांच्या मनात निर्माण होते आहे. त्याबद्दल लिहिले जात आहे, चर्चा केल्या जात आहेत, प्राप्त परिस्थितीबद्दल कुणाला ना कुणाला दोष दिला जात आहे. दोष देणारे बहुधा आपण ह्या जंगलतोडीला मुळीसुद्धा जबाबदार नाही असं धरून चालतात.

Nowadays deforestation is such a subject. It is not as though the danger arising out of deforestation has presented itself all of a studden. It is true, however, that the discussion of this subject has started only recently. Educated people are beginning to fear ('fear is beginning to develop in the minds of those who can write and read') that the forests are being cut down at a great rate, they will soon be destroyed, then the rainfall will decrease, the soil will wash away, and our rich land will become a desert. Things are being written about this, discussions are being held, somebody or other is blamed for the existing situation. Generally the people who ascribe the blame take for granted that

परंतु वास्तविक पाहता, आपण सर्वच कमी-अधिक प्रमाणात जबाबदार असतो. जो स्वयंपाकासाठी किंवा आंघोळीचं पाणी तापवायसाठी प्रत्यक्ष लाकूड जाळीत नाही तोही बांधकामासाठी लाकूड वापरतो, त्याच्या घरात लाकडी फर्निचर असते, तो लाकूड व बांबूपासून तयार केलेल्या कागदाचा आणि कापडाचा वापर करतो, आणि ज्या बनविण्यासाठी प्रचंड प्रमाणात लाकूड जाळले जाते अशा अनेक वस्तू वापरतो. तसं पाहिलं तर प्रत्यक्ष जाळण्यासाठी लाकूड वापरणाऱ्यापेक्षा तो जास्तच लाकूड वापरतो.

they themselves are in no way responsible for this deforestation. But looking at it realistically, all of us are to some extent ('to a lesser or greater extent') responsible. The person who himself does not burn wood directly for cooking or for heating bath-water uses it for construction; he has wooden furniture in his house, he uses paper and cloth made from wood and bamboo, and uses many articles whose manufacture requires the burning of huge quantities of wood ('to make which wood is burned on a huge scale'). Actually, he uses more wood than the person who burns it directly.

ह्या परिस्थितीत, लाकडाला वेगवेगळ्या उपयोगांसाठी मागणी असल्यामुळे लाकूड आता ज्या प्रमाणावर तोडले जाते त्या प्रमाणावर तोडले जात राहणार हे उघड आहे. किंबहुना वाढत्या लोकसंख्येमुळे हे प्रमाण वाढतेच राहणार आहे. तेव्हा जंगले तुटणार हे गृहीत धरून, सगळेच जंगल नाहीसे होऊ नये अशी आपली इच्छा असेल तर फार मोठ्या प्रमाणावर झाडे लावत राहणे आणि लोकसंख्येला आळा घालण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर करणे एवढे दोनच मार्ग आपल्यापुढे आहेत.

In this situation it is clear that since there is a demand for wood for various purposes, wood is going to continue to be cut at the same rate as it is now. Moreover, because of the increasing population the rate (of deforestation) is going to continue to increase. So we must take for granted that forests are going to be cut. And if we want to prevent them from being completely destroyed ('if it is our wish that all the forests not be destroyed') there are only two things we can do ('two paths before us')—keep on planting trees on a large scale and attempt on a war footing to curb the (growth of) population.

तांत्रिक शिक्षणाची गरज

The Need for Technical Training

तरुण : नमस्कार, साहेब.

Namaskar, saheb.

मॅनेजर : नमस्कार. काय पाहिजे तुम्हाला?

Namaskar. What can I do for you?

तरुण : तुमच्याकडेच काम होतं जरा.

I wanted to see you personally about something ('I have some business with *you*')[1].

मॅनेजर : बोला की मग.

Then speak up.

तरुण : तुमच्याकडे काही जागा भरायच्या आहेत असं कळलं.

I understand that there are some posts to be filled in your organization.

मॅनेजर : एक सुतार, एक सुताराचा मदतनीस आणि एक वायरमन अशा जागा भरायच्या आहेत.

A carpenter, a carpenter's helper, and an electrician—these are the posts to be filled.

तरुण : क्लार्कची एखादी जागा नाही का?

Isn't there some clerical job?

मॅनेजर : नाही. ज्या जागा भरायच्या आहेत त्यासाठी तुमचं काही ट्रेनिंग असलं तर अर्ज करा.

No, if you have any training for the posts to be filled, you can apply.

तरुण : माझं बी. ए. पर्यंत शिक्षण झालंय साहेब.

I am educated up to B. A., saheb.

मॅनेजर : त्याचा आम्हाला काही उपयोग नाही. इतर काही येत असलं तर सांगा. नुसतं बी. ए. घेऊन काय करायचंय?

That's no use to us. Tell me if you can do anything else. What can one do with just a B. A.?

तरुण : मला नोकरीची फार गरज आहे साहेब. घरची परिस्थिती फार गरिबीची

I need a job badly, saheb. We are very poor ('the family's circumstances are very poor'). My father

आहे. वडील रिटायर झालेले आहेत. माझ्यावरच सगळं कुटुंब अवलंबून आहे.

is retired. The whole family depends on me.

मॅनेजर : अहो, त्याला मी काय करणार ! नोकरीची गरज सगळ्यांनाच असते. म्हणून काय आम्ही सगळ्यांना नोकऱ्या देऊ शकतो का ! तरी बरं, गेली कित्येक वर्षं सुशिक्षित बेकारांच्या प्रश्नाबद्दल ओरडा चालू आहे. मग तुमच्यासारखे तरुण लोक कॉलेजात न जाता काहीतरी व्यवहारात ज्याचा उपयोग आहे असं शिक्षण का घेत नाहीत !

What can I do about it? Everybody needs a job. Does that mean that we can give jobs to everyone? When[3] for the past so many years everyone has been shouting ('shouting has been going on') about the question of the educated unemployed, why don't you young people acquire some education with practical use instead of going to college?

तरुण : काहीतरी काम द्या, साहेब. अगदी नाही म्हणू नका.

Please give me some work, saheb. Don't say an outright no.

मॅनेजर : तुमच्याजोगतं काही काम नाही म्हणून सांगितलं ना ! मग आता विनाकारण माझा वेळ घेऊ नका.

Haven't I told you that there is no work suitable for you? Then don't take my time unnecessarily.

Notes

[1]जरा gives the sentence an apologetic tone which is difficult to convey in the translation.

[2]तरी बरं means 'even when.'

सामाजिक प्रतिष्ठा–फक्त पांढरपेशांनाच

Social Prestige—Only for the White-collared

१ : मला हे कळत नाही की इतके सुशिक्षित लोक बेकार हिंडत असताना आणखी आणखी तरुण लोक कॉलेजच्या मागे का लागतात. डिग्री मिळाली तरी नोकरीची शक्यता फारच कमी असते. तरीसुद्धा डिग्री पदरात पाडून घ्यायला झटायचं आणि मग मी कॉलेज शिकलेलो आहे म्हणून मला कारकुनाची नोकरी दिली पाहिजे म्हणून लोकांचे उंबरठे झिजवायचे.

I can't understand why when so many educated people are wandering about unemployed more and more young people are going in for college education. Even when you get a degree there is very little possibility of getting a job ('the possibility of a job is very low'). Even so you struggle to get a degree and then go to people ('wear down people's thresholds') and insist that you be given a clerk's job because you have a college education.

२ : ह्याची कारणं आपल्या सामाजिक परिस्थितीत सापडतील. पूर्वीपासून पांढरपेशांनाच आपल्या समाजात प्रतिष्ठा मिळालेली आहे. शारीरिक कष्टाची प्रतिष्ठा ही कल्पना फार आधुनिक आणि पाश्चात्यांकडून आपण उसनी घेतलेली आहे. ती इथल्या लोकांच्या मनात कधीच रुजली नाही. तेव्हा पिढीजात कष्टाची कामं करीत आलेल्यांना वाटतं की आपल्या मुला-बाळांना शिक्षण दिलं, की त्यांचा पांढरपेशा समाजात शिरकाव करण्याचा मार्ग खुला होईल.

The reasons for this can ('will') be found in our social setup. From long back only white-collar workers have had status in our society. The dignity of physical labor is a very modern idea and we have borrowed it from Westerners. It has never taken root in the minds of people here. Therefore those who for generations have done physical labor think that if they give their children education the door will be opened for them to enter into white-collar society.

१ : पण शिकलेल्या सगळ्यांना नोकऱ्या मिळणं अशक्य आहे हे दिसत असूनही

But even when they can see that it is impossible for all educated persons to get jobs isn't it

नुसतं पुस्तकी शिक्षण घेणं हा मूर्ख-पणा नाही का ?

stupid to acquire only bookish education?

२ : त्यांना फक्त नोकऱ्या असलेलेच लोक दिसतात. शिवाय इतक्या सगळ्यांनी तांत्रिक शिक्षण घ्यायचं जरी ठरवलं तरी तितक्या प्रमाणात त्यासाठी सोय कुठे आहे ? बरं, तांत्रिक शिक्षण घेऊनही नोकरीची काही हमी मिळत नाहीच.

They see only those who have jobs. Besides, even if all these people decide to get technical training, where are there that many facilities for it? Also, even if you do get technical training you have no guarantee that you'll get a job.

१ : नोकरीची हमी नसेल कदाचित, पण स्वत:च्या हिमतीवर काम तरी करता येतं ना ?

You may not have the guarantee of a job, perhaps, but you can at least work on your own, can't you?

२ : तेच तर नको असतं बहुतेकांना. स्वत:च्या हिमतीवर काम करायचं म्हणजे फक्त काम होईल त्या दिवशी पैसे मिळणार. आजारी पडलं, रजा हवी असली तर त्या दिवशीचे पैसे बुडले. नोकरीसारखी शाश्वती नसते कशाची. पुन्हा प्रॉव्हिडंट फंड, पेन्शन असलं काही नाही, म्हणजे म्हातारपणी भुके मरायचं.

That's what most people don't want. Working on your own means you earn money only on the day you work. If you are sick, or you want leave, you lose the pay for that day. There is no security as in a job. Also, there is nothing like a provident fund[1] or a pension. Which means you starve to death in your old age.

१ : पण पैसे मिळतात तेव्हा कारकुना-पेक्षा जास्त मिळतात ना ? मग त्यातले शिल्लक टाकून भाकड दिवसांची तरतूद करता येणार नाही का ?

But when you do earn you earn more than a clerk, don't you? Then can't you provide for the days you don't have work by putting some of your earnings aside?

२ : तसं होत नाही. पोटापुरते किंवा त्यापेक्षा थोडेसेच जास्त पैसे मिळत असले की शिल्लक टाकणं कठीण जातं.

It doesn't work that way. If you earn just enough for your needs or only a little more, it's difficult to save.

१ : म्हणजे तुमचं म्हणणं असं की हे सगळं आहे असंच चालू राहणार.

२ : तसं नाही, पण परिस्थितीत काही-तरी बदल झाल्याशिवाय लोकांच्या दृष्टिकोनात कसा बदल घडून येणार ? तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या संख्येत आणि त्यांत मिळणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ झाली पाहिजे. नोकरी न करता रोजगारावर किंवा कंत्राटावर सुतार, प्लमर, पेंटर, मेकॅनिक असली कामं करणाऱ्यांना कोणत्या तरी स्वरूपात बेकारभत्ता, पेन्शन वगैरेची सोय झाली पाहिजे. आणि मुख्य म्हणजे अशा लोकांना समाजात पांढरपेशांइतकी प्रतिष्ठा लाभली पाहिजे. मग बघा लोकांच्या दृष्टिकोनात बदल होतो की नाही.

१ : म्हणजे लोकांना अनुकूल परिस्थिती कुणीतरी आयती तयार करून द्यायला पाहिजे, तेव्हा ते बदलणार. आपण परिस्थितीत बदल घडवू शकतो असं का नाही कुणाला वाटत ?

Then you mean to say that all this will go on exactly as it is.

Not quite, but unless the circumstances change in some way, how can there be a change in people's attitude? The number of institutions giving technical training must increase and the quality of the training they give must improve. Some provision must be made for unemployment benefits in some form, and for pension, etc. for those who, instead of being employed in a regular job, work on daily wages or on a contract basis as carpenters, plumbers, painters, mechanics, and so on. And mainly, such people must achieve the same status in society as white-collar workers do. Then you will see whether or not people's attitude changes.

You mean someone has to hand them readymade favorable circumstances, then they will change. Doesn't anyone think that he can bring about a change in the situation?

Note

[1]A provident fund is a retirement fund.

भिकारी

Beggars

१ : त्या भिकाऱ्याला तू किती रागारागानं हाकललंस.

२ : मग मला त्याचा राग आलाच होता. कसा अडवत होता पाहिलंस ना? सायकलचं हँडलच धरून ठेवलं होतंन. आणि माझ्या अंगालाही हात लावत होता घाणेरडा.

१ : तुला दया येत नाही अशा भीक मागणाऱ्या लोकांची? मला तर फार दया येते. ते अगदी गरीबातले गरीब असतात.

२ : इथेच तर चुकतोस तू. बहुतेक भिकारी मुळीच वाटतं तितके गरीब नसतात. तुझ्यासारखे त्यांची दया येणारे लोक त्यांना भरपूर पैसे देतात. एकदा कुणीतरी मुंबईतल्या भिकाऱ्यांची पाहणी केली होती, तेव्हा बऱ्याच कष्ट करून पोट भरणाऱ्या लोकांपेक्षा त्यांची सरासरी मिळकत जास्त असते असं आढळून आलं. कीव करायचीच असली तर ती मरेमरेतो श्रम करूनही त्यांना पोटापुरतं मिळत नाही पण जे येईल जाईल त्याच्यापुढे हात पसरण्याइतके स्वाभिमानशून्य नसतात, त्यांची करावी.

How angrily you drove off that beggar.

Well, I *was* angry with him. Did you see how he was blocking my way? He had grabbed the handlebar of my bike. And he was touching me ('was putting his hand on my body'), the dirty fellow.

Don't you have any pity for such people who beg? As for me, I feel a lot of pity for them. They are the poorest of the poor.

That's where you're wrong. Most beggars are not as poor as we think. People like you who feel sorry for them give them plenty of money. Once when somebody did a survey of beggars in Bombay, it was found that their average earnings were a lot more than those of people who make a living by hard manual labor ('who work hard and fill their bellies'). If you have to pity anybody, pity those who kill themselves working hard and still don't make enough to live on, but who have too much self-respect ('but are not so lacking in self-respect as') to stretch out their hands to anyone who passes by.

१ : पण हे तरी भीक मागतात ते का ? कुठे काही काम मिळत नाही म्हणून अगतिक होऊनच ना ?

२ : काही जणांच्या बाबतीत तसं असेल. विशेषत: अपंग, कुष्ठरोगी वगैरेंना काम मिळणं शक्य होत नाही. पण इतर सगळे काही एवढे अगतिक नसतात. ज्याला काम करून पैसे मिळवायचेत त्याला काहीतरी मार्ग सापडतो. अगदी कचऱ्याच्या डब्यातनं डबे, बाटल्या, कागद, प्लॅस्टिकचे तुकडे अशा वस्तू जमा करून त्या विकून पोट भरणारे सुद्धा लोक असतात. पण भिकाऱ्यांना एकदा कळलं की काही काम न करता पोट भरू शकतं, की ते भीक मागणं सोडायला तयार नसतात. शहरांतून भिकाऱ्यांसाठी बेगर्स होम्स असतात. तिथे भिकाऱ्यांना निवारा आणि अन्न मिळतं. पण त्याच्या बदल्यात जमेल ते आणि जमेल तेवढं काम करावं लागतं. तेही बऱ्याचशांना नको असतं म्हणून ते तिथून पळून जातात.

१ : पण मग ह्या भिकाऱ्यांच्या समस्येवर उपाय काय ?

२ : उपाय एकच. तो म्हणजे कुणीही त्यांना भिक्षा न देणं.

१ : पण एखादा लक्तरं नेसलेला, पोट खपाटी गेलेला माणूस तुमच्याकडे दहावीस पैसे मागायला लागला की दिल्याशिवाय राहवत नाही. असं वाटतं, आपण साधं कुठेतरी शॉपिंग केलं,

But why do people who beg do so? Isn't it because they don't get work anywhere and so have no other recourse?

That may be true of some of them. Especially for the crippled, leprosy-affected, and other such people it is not possible to get work. But all the rest of them are not that helpless. The person who wants to work and earn money finds some way (to do so). There are even people who make a living by collecting things like cans, bottles, paper, and pieces of plastic from garbage cans and selling them. But once beggars find out that they can make a living without working they are not ready to give up begging. In cities there are homes for beggars. There they get shelter and food. But in return for that they have to do what work they can and as much as they can. Many of them don't like even that so they run away from there.

Then what is the solution to this problem of beggars?

There is only one solution, and that is for no one to give them alms.

But when a man dressed in rags with a sunken belly begins to ask you for ten or twenty paise you can't bear not to give it to him. You feel, if I do a little shopping somewhere or eat just a little in a restaurant I easily blow ten or

हॉटेलात थोडंसं खाल्लं तरी दहावीस रुपये सहज उडवतो. मग त्याला बिचाऱ्याला थोडेसे पैसे दिले तर काय बिघडलं ?

twenty rupees. So what's wrong with giving that poor fellow a few paise?

२ : बिघडतं ते एवढंच की नुसते पैसे मागून निर्वाह होऊ शकतो असं एकदा कळल्यावर भिकारी भीक मागायचे थांबायचेच नाहीत. भिकाऱ्यांचा उपद्रव सगळ्यांनाच वाटतो. तुला वाटतो की नाही ?

What's wrong is that once beggars learn that they can make a living by just asking for money they will never stop begging. Everyone finds beggars an annoyance. Don't you?

१ : अर्थातच. कुठेही गेलं की ते तोंड वेंगाडत समोर येतात. गोरी कातडी पाहिली की जास्तच त्रास देतात. त्यांची कीव जरी वाटली तरी किळसही येते. आणि मग उगीचच अपराध्यासारखं वाटतं.

Of course. Anywhere you go they come up to you and beg.[1] And if they see a white skin they bother you even more. Even if you feel pity for them you also feel disgust. And then you feel needlessly guilty.

२ : झालं तर मग. म्हणजे भिकारी कुणालाच आवडत नाहीत. मग ते नाहीसे करण्याचा त्यांना भीक न घालणं हा एकुलता एक मार्ग नव्हे का ?

There you are then. That means nobody likes beggars. Then to get rid of them the only way is not to give them alms, isn't it?

Notes

[1]Though तोंड वेंगाडणे literally means 'to make a piteous face' the meaning current today is simply 'to beg.'

शेतकरी आंदोलन

The Farmers' Movement

१ : हे शेतकरी आंदोलन कशासाठी आहे ?

What is this farmers' movement for?

२ : त्यांच्या मालाला योग्य किमती मिळाव्या म्हणून.

It's to get fair prices for their produce.

१ : म्हणजे आत्ता त्यांना योग्य किमती मिळत नाहीत का ?

You mean, at present they don't get fair prices?

२ : नाही. खरं म्हणजे कधीच मिळत नव्हत्या.

No, actually they *never* have.

१ : मग शेती करणं लोकांना परवडतं कसं ?

Then how can people afford to farm?

२ : त्याचं असं आहे, भारतात बहुसंख्य शेतकऱ्यांना अतिशय थोडी जमीन असते. त्यात ते पोटापुरतं पिकवतात. थोडंफार जादा पिकले तर ते विकतात, पण त्या मालाला किंमत किती येते ह्याची काळजी ते इतके दिवस करीत नसत. एक म्हणजे इथला शेतकरी वर्ग अतिशय अडाणी, मागासलेला आणि असंघटित आहे. आणि दुसरं म्हणजे बाजाराच्या चढउताराप्रमाणे काही वेळा अगदी कमी किमती मिळाल्या तरी काही वेळा खूप जास्तही मिळून जायच्या. आणि शेवटी ह्या सगळ्या प्रक्रियेवर कसलंच नियंत्रण

It's like this. In India most farmers have very little land. On that they raise enough to feed themselves. If they raise a little extra they sell it, but all these years ('days') they were not concerned about what price they were getting for this produce. For one thing, here the farmers ('the farmer class') are extremely ignorant, backward, and unorganized. And another thing, because of market fluctuations though sometimes (farmers) got very low prices sometimes they also got very high (prices). And finally, because there was no kind

नसल्यामुळे मिळतंय त्यात शेतकऱ्याला समाधान मानावंच लागत असे.

१ : मग आता ह्या परिस्थितीत काय बदल झाला आहे ?

२ : बरेच बदल झाले आहेत. एक म्हणजे शहरातले ग्राहक संघटित झाले आहेत. किमती फार वाढायला लागल्या की ते ओरडतात. आणि ते मोठ्या संख्येने काही ठिकाणी केंद्रित झालेले असल्यामुळे त्यांच्यात असंतोष भडकण्याची सरकारला भीती वाटते. त्यामुळे सरकार किमतींवर नियंत्रण घालतं. पण शेतमालाच्या किमतींवर नियंत्रण आलं तरी बी, खतं, कीटकनाशकं, शेतीची अवजारं, बैल ह्यांच्या किमतींवर त्या प्रमाणात नियंत्रण राहात नाही. दुसरं, सरकार काही प्रमाणात धान्याची खरेदी करतं. त्याच्या किमती दरवर्षी जाहीर करतं. परंतु त्या किमतींत उत्पादन झालेल्या सर्व धान्याची खरेदी करायला बांधलेलं नसतं. ज्या वर्षी धान्य कमी पिकतं आणि खुल्या बाजारातल्या किमती सरकारने जाहीर केलेल्या किमतींपेक्षा जास्त असतात त्या वर्षी सरकार सक्तीने धान्यखरेदी करतं, तर ज्या वर्षी भरपूर उत्पादन होऊन खुल्या बाजारातल्या किमती घसरतात त्या वर्षी आपण जाहीर केलेल्या भावात सरकार खरेदी करत नाही.

of control over this process the farmer had to be satisfied with whatever he got.

Then what change has taken place in this situation now?

Many changes have taken place. One thing is that the urban consumers have become organized. As soon as prices start to increase sharply they shout. And since they are concentrated in large numbers in a few places, the government is afraid of discontent flaring up among them. So the government puts controls on prices. But even if there are controls on the prices of agricultural produce there is no proportional control on the prices of seed, fertilizer, insecticides, agricultural implements, or bullocks. Secondly, the government purchases some of the grain. Every year it the declares prices. But it is not obligated to buy at those prices all the grain that is produced. In a year when little grain is produced and the prices in the open market are higher than the prices declared by the government, the government forces the farmers to sell it grain ('buys grain with compulsion'), and in a year when production is high and the prices in the open market crash, the government does not purchase (grain) at the rates it has declared.

१ : म्हणजे इथे शेतमालाला हमी किंमत नसतेच.

You mean that there *isn't* any guaranteed price for agricultural produce here.

२ : अगदी बरोबर. तर ह्या सगळ्या गोष्टींमुळे शेतकऱ्यांच्या हळूहळू डोक्यात शिरायला लागलं की आपल्या कष्टाचं फळ काही आपल्या पदरात पडत नाही, आणि सरकारची ह्या बाबतीतली भूमिका आपल्यावर अन्याय करणारी आहे. अर्थात हे शेतकऱ्यांना पटलं तरीसुद्धा नेतृत्वाच्या अभावी त्यांचं संघटित आंदोलन उभं राहात नव्हतं, ते आता उभं राहिलं आहे.

Quite right. So because of all these things farmers have gradually begun to realize (' it has gradually begun to enter the farmers' heads') that they don't receive the fruit of their labor, and that the government's position in this regard is unjust (' is one which does them an injustice '). Of course, (before) even if farmers were convinced of this, because of a lack of leadership an organized movement did not get underway. Now that movement has started.

१ : म्हणजे अमेरिकेत ह्या शतकाच्या सुरुवातीला जी गोष्ट झाली ती इथे आत्ता होते आहे.

You mean what happened in America at the beginning of this century is happening here now.

२ : हो ना.

Yes.

१ : पण अमेरिकेत शेतकऱ्यांना परवडतील असे भाव मिळतात आणि त्या भावात खरेदी करायला जरी सरकार बांधलेलं असतं तरी त्याच्या बदल्यात शेतकऱ्यांना काही बंधनं स्वीकारावी लागतात. उदाहरणार्थ कुठलं पीक किती एकरांत लावायचं.

But although American farmers get good prices (' prices that enable them to make a profit ') and the government is obligated to purchase (their produce) at those prices, in return the farmers have to accept certain restrictions. For instance, what crop to plant on how many acres.

२ : तशी बंधनं इथले शेतकरीही स्वीकारतील, पण आत्ता तर कुठे शेतकऱ्यांच्या लढ्याची सुरुवात आहे. अजून शेतकरी आणि सरकार ह्यांच्यात संवाद साधायचा आहे. सध्या नुसतं थोडेफार दर वाढवण्याचं आश्वासन

Farmers here will also accept such restrictions, but the farmers' struggle has only just begun. A dialogue between the farmers and the government still has to come about. So far all that has come

देणं एवढंच सरकारकडून होतंय. त्याला काहीच अर्थ नाही. उत्पादन-खर्चावर आधारित किमती हे तत्त्व सरकारने मान्य केलं तरच पुढली धोरणं ठरवण्याचा प्रश्न उद्‌भवतो, नाही का ?

८५

from the government has been an assurance (' to give an assurance') that prices will be increased a little. That has no meaning. Only if the government agrees to the principle of prices based on the cost of production does the question of determining further policies arise, don't you think ?

राखीव जागा

Reserved Seats

Since Independence the government of India has pursued a policy of reserving a certain proportion of seats in colleges and in government service for members of disadvantaged groups. For the most part others have accepted this policy with little protest. Recently, however, as the problem of unemployment increases among the educated, there is increasing controversy about this policy. Both sides of the issue are brought out in the letter below.

प्रिय सुधीर,

मधे इथे एक विचित्र घटना घडली. माझा मित्र वरुण ठोंबरे तुला आठवतो का ? त्याला शेवटी मेडिकलला ॲडमिशन मिळाली नाही. तो फारच हवालदिल झालाय. दाढीचे खुंट वाढवून नुसत्या सिगारेटी पुंकत बसतो. त्याच्या घरच्यांनी नि आम्ही मित्रांनी सुद्धा त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो काही ऐकून घेण्याच्या मन:स्थितीत नाही. आधी मेडिकलमधे ॲडमिशन नाही मिळाली तर आपल्या आयुष्यात काही राम राहिला नाही असं वाटून घेणं हे माझ्या मते मूर्खपणाचंच आहे. पण त्याला तसं सांगितलं तर तो म्हणतो, "माझी बुद्धी किंवा तयारी कमी पडली म्हणून मला ॲडमिशन मिळाली नसती तर मी ते अपयश पचवलं असतं. पण इथे मला

Dear Sudhir,

Recently a strange thing happened here. Do you remember my friend Varun Thombre ? He finally didn't get admission into medical college. He's gotten very depressed. He's grown a stubble on his chin, and he sits all day smoking cigarettes. His family and we friends too have tried to reason with him but he is in no mood to listen. First of all, in my opinion, it's stupid to feel that if you don't get admission into medical college there's no meaning left in your life. But if you tell him that he says, "If I were lacking in intelligence or in preparation I could have accepted this failure. But in this case I didn't get admission because I belong to a particular caste. Why should I put up with that?" And

अॅडमिशन मिळाली नाही ती मी एका विशिष्ट जातीचा म्हणून. ते मी का सहन करून घ्यावं ?" आणि इथेच खरी मेख आहे. मेरिटच्या यादीत वरुणच्या खूप मागे असलेल्या एकाला बी. सी. म्हणून प्रवेश मिळाला म्हणून वरुण चिडलाय.

मी त्याला म्हटलं की हजारो वर्षं केवळ विशिष्ट जातीचे म्हणून ह्या लोकांवर अन्याय नाही का झाला ? तर तो म्हणाला, "मी कुठे अन्याय केलाय ? माझ्या वाडवडिलांनी केलाय. मग त्याचं परिमार्जन मी का म्हणून करायचं ? आत्ता तर तो विशिष्ट जातीचा आहे म्हणून त्याला प्रवेश नाकारण्यात येत नाही ना ? त्याला प्रवेश मिळवण्याची संधी माझ्या बरोबरीनंच दिली जाते. मग मिळवावेत त्यानं माझ्यापेक्षा जास्त मार्क." मी त्याला समजावायचा प्रयत्न केला की लंगडा आणि पाय शाबूत असलेला अशा दोघांची जर शर्यत लावली तर त्यांना सारखी संधी दिली गेली असं आपण कसं म्हणू शकू ? तो म्हणतो इतकी वर्षं संधी देऊनही ते लंगडेच राहिले तर तो त्याचा दोष नाही.

तसं डोकं ताळ्यावर असताना, हजारो वर्षं शिक्षणाला वंचित राहिलेल्यांना तीसपस्तीस वर्षं शिक्षणाची संधी मिळून ते इतरांच्या बरोबरीला येणं अशक्य आहे हे त्यानंही कबूल केलं असतं. पण आत्ता ह्या राखीव जागांच्या धोरणाचा फटका त्याला स्वतःलाच बसल्यामुळे तो त्या बाबतीत समतोल राखून विचार करू

this is the real issue. Varun is angry because someone much further down the merit list got admission because he was from the Backward Class.

I said to him, "For thousands of years haven't these people suffered injustice because they were of a particular caste?" So he said, "When did I do any injustice? My ancestors did. Why should I atone for it? At least now he's not denied admission because he belongs to a particular caste, is he? He is given an equal opportunity with me to get admission. Then let him get more marks than me." I tried to tell him if we set a race between a lame man and one whose legs are sound how can we say they have an equal opportunity? He says that even after giving them opportunities for so many years if they still remain lame he's not to blame.

When in his right mind he himself would have admitted that it is impossible for those who have been denied education for thousands of years to come up to the level of others in thirty or thirty-five years. But now because he himself has to bear the brunt of the policy of reservation of seats, he can't think about it in a balanced way (' main-

शकत नाही. तो मला म्हणाला, "तुझं काही नुकसान झालं नाही म्हणून त मला तत्त्वज्ञान शिकवतोयस." खरं आहे त्याचं. मला स्वत:ला तोशीस लागली असती तर कदाचित माझा दृष्टिकोन बदलला असता. शेवटी माणूस स्वार्थावर मात करू शकत नाही. तेव्हा वरुणसारखेच जे अनेक असतील की ज्यांना कॉलेजात प्रवेश किंवा नोकरी किंवा बढती ह्यांना मुकावं लागलं आहे त्यांच्या मनात राखीव जागांच्या धोरणामुळे दलितांच्याबद्दल कडवटपणाच राहणार. आणि तरीसुद्धा ते धोरण सोडून देणं चुकीचं होईल असं मला वाटतं. हा गुंता कसा सुटणार कोण जाणे.

taining a balance'). He said to me, "You are teaching me this philosophy because you have not lost anything." What he says is true. If I had been affected, perhaps my attitude would have changed. Ultimately, man cannot overcome selfishness. So in the minds of those like Varun who fail to get admission into college or a job or a promotion there is bound to be bitterness about the *dalits*. But even still I feel it would be a mistake to abandon this policy. How this knotty problem will be solved God knows.

असो. बाकी विशेष काही नाही. त कधी येणार ते आधी कळव म्हणजे स्टेशनवर तुला घ्यायला येईन.

तुझ्या आईबाबांना नमस्कार सांग.

तुझा
हेमंत

Well, so much for that. There is no other news particularly. If you let me know when you are coming I'll come to the station to pick you up.

Give my namaskars to your parents.

Yours,
Hemant

About the Authors

Jai Nimbkar was born in Pune, Maharashtra in 1932. She has an M. A. in sociology from the University of Arizona. She is an accomplished writer in both English and Marathi. Her short stories and articles appear in many periodicals. Her novel *Temporary Answers* was published by Orient Longman, and a collection of short stories, *The Lotus Leaves*, was published by Writers' Workshop, Calcutta. She lives in Phaltan where she pursues the double career of writing and market gardening.

Maxine Berntsen was born in Escanaba, Michigan in 1935. She has an M.A. in English from Columbia University and began her career as a teacher of English in the U. S. and India. She later received a Ph.D. in linguistics from the University of Pennsylvania. Since 1966 she has been living in India and in 1978 became an Indian citizen. She resides in Phaltan, District Satara, Maharashtra, where in addition to textbook writing she is conducting an experiment in informal education.

Marathi Teaching Materials
by Maxine Berntsen and
Jai Nimbkar

Elementary

Marathi Structural Patterns. Book One

Marathi Conversational Situations

Marathi Vocabulary Manual

Marathi Illustrated Vocabulary

Intermediate

Marathi Readings

Intermediate Marathi Reader

Marathi Structural Patterns, Book Two (in preparation)

Advanced

Advanced Marathi Reader

Reference materials

Marathi Reference Grammar

A Basic Marathi – English Dictionary

Marathi Teaching Materials: a User's Guide (in preparation)

Available from :

South Asia Regional Studies Center,
University of Pennsylvania,
Philadelphia, Pennsylvania

This volume is a bilingual Marathi reader. It is designed for adult learners of Marathi at the intermediate level and intended to be used after the authors' *Marathi Conversational Situations* and before their *Marathi Intermediate Reader*.

Often at the intermediate level students concentrate on reading and lose the conversational skills they developed at the elementary level. This book, with most of the readings in the form of conversations, will help integrate conversation and reading skills and enable the student to continue progress in both.

The readings in this volume should not only help the student to improve his language skills but should give him a sense of what is going on in contemporary Maharashtrian life and thought. Selections deal with such contemporary topics as love marriage, divorce, afforestation, reserved seats, and the farmers' movement. All the passages in this book have been written by Jai Nimbkar, a distinguished writer in both Marathi and English, and author of *Temporary Answers*, a novel, and *The Lotus Leaves*, a collection of short stories.

Though this volume was designed for learners of Marathi it should also be of use for Maharashtrian learners of English.

American Institute of Indian Studies, New Delhi